मधू शिरगांवकर

# सुवर्णमती





# ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# सुवर्णमती

## लेखिका : मधू शिरगांवकर



# सुवर्णमती

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.



# सुवर्णमती

लेखिका : मधू शिरगांवकर

Plot 13, Mangaldham, Pune 411038

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप – 09822208197

ई मेल -- madhushirgaonkar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ७ जानेवारी २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



# लेखिकेची ओळख



सौ मधू शिरगांवकर , वय ५३वर्षे .

पेशाने फार्मास्युटिकल ट्रेनर आणि कन्सल्टंट .

पती, सासू सासरे, दोन मुले व आईवडील यांच्यासह गेली २८ वर्षे पुण्यात वास्तव्य.

पन्नासाव्या वर्षी लेखनास सुरूवात केली. लेखन करतानाचा आनंद सर्वात महत्वाचा आणि वाचकांची दाद ही सगळ्यात मोठी पावती असं मानते.

वाचता वाचताच लेखनाची सुरूवात झाली. जवळपास ४० लघुकथा, पाच दीर्घकथा, अनेक ललित लेख, व सध्या एका कादंबरीचे लेखन सुरू आहे.

ईसाहित्य ने प्रकाशित केलेली याआधीची पुस्तके

१. प्रतिबिंब ( दीर्घभयकथा ) जून २०१९


२.रंजकथा ( १० लघुकथांचा कथासंग्रह ) ऑगस्ट २०१९

"श्री व सौ" या २०१९ च्या दिवाळीअंकात तीन लघुकथा कथात्रयी या सदरात प्रकाशित.

"माझा मराठीचा बोल" दिवाळीअंकात २०१७, २०१८, व २०१९ च्या आवृत्यांमध्ये कथा प्रकाशित.

E mail : madhushirgaonkar@gmail.com


Mobile number: 9822208197




## सौ. मधू शिरगांवकर यांच्या इतर पुस्तकांची लिंक

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ranjkatha_madhu_shirgaonkar.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/pratibimb_l_madhu_shirgaonkar.pdf







# अर्पणपत्रिका

ही प्रेमकथा माझ्या जीवनात अलोट प्रेम भरणाऱ्या अतुलला अर्पण !

सौ मधू शिरगांवकर

मनोगत



'सुवर्णमती', मी लिहिलेली पहिली दीर्घप्रेमकथा. प्रत्येकाच्या मनात एक राजाराणीचं चित्रं असतंच ना? प्रामुख्याने लहानपणी त्यांच्या कथा प्रत्येकाने ऐकलेल्या असतातच. पहिली दीर्घप्रेमकथा लिहिताना मला राजाराणीच आठवले.

पहिला आराखडा लिहिल्यावर, माझे स्नेही व लेखनातले मार्गदर्शक, डॉक्टर विवेक देशपांडे, 'विवेकदादा', यांनी अनेक चांगल्या सूचना केल्या. त्यावर विचार करताना, कथा अधिक परिपूर्ण, समतोल होत गेली.

सुवर्णमतीनंतर मी अनेक दीर्घकथा लिहिल्या. परंतु, पहिल्या अपत्याप्रमाणेच ही माझ्या हृदयाच्या अगदी जवळ आहे.

ईसाहित्यने नेहमीप्रमाणेच खुल्या दिलाने माझे लेखन वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे मोठे काम केले आहे. मन:पूर्वक धन्यवाद ईसाहित्य!

सौ मधू शिरगांवकर





# सुवर्णमती

सुवर्णमती

सुवर्णमती





## उपोद्‌घात / पूर्वपीठिका

गंगानगरीच्या राजदरबारात अस्वस्थ शांतता पसरली होती.

काही दिवसांपूर्वी हेर खबर घेऊन आला होता. शेजारच्या पंचमनगरी राज्याने गंगानगरीवर आक्रमण करण्याची तयारी सुरू केली होती. गंगानगरीचे सैनिक प्राण पणाला लावून झुंजले असते पण पंचमनगरीच्या सैन्याकडे परकीयांनी पुरवलेल्या लांब पल्ल्याच्या तोफा, बंदुका आणि दारूगोळा होता. त्यांचा मुकाबला करण्यासाठी तितकीच चांगली शस्त्रास्त्रे हवी होती. परकीयांची शस्त्रास्त्रे घेऊन आपसात लढू नये असे गंगानगरीचे राजे सुरजप्रतापसिंहांचे मत. त्यामुळे परकीय व्यापारी शस्त्रास्त्रे घेऊन आले तेव्हा त्यांनी एकच लांब पल्ल्याची बंदूक केवळ आवड म्हणून ठेवून घेतली, पण बाकी माल परत पाठवला होता.

आता या आक्रमणाचा मुकाबला कसा करायचा, ही मात्र चिंताजनक बाब बनली होती. राजाजींनी, मंत्रीजींना एक खलिता तयार करायला सांगितला, ज्यात पंचमनगरीच्या राजाला संदेश पाठवला की 'आपसात लढण्याने काहीच हासील होणार नाही. दोन्ही राज्यांची सेना हकनाक मारली जाईल. प्रजा होरपळून निघेल. फायदा फक्त परकीयांचा होईल.'

त्यावर पंचमनगरीतून उत्तराचा खलिता आला होता आणि म्हणूनच आजची राजसभा भरली होती. परंतु खलित्यातील मजकूर वाचून चिंता अधिकच वाढली होती. पंचमनगरीच्या राजाने, खलित्यात, राजाजींच्या सामोपचाराच्या भाषेस घाबरटपणा असे संबोधून लढण्याची कुवत नसेल तर सरळ शरणागती पत्करावी व तहास तयार व्हावे असे सुचवले होते.

तहाच्या अटीही अत्यंत अपमानकारक होत्या. गंगानगरीची सर्वात सुपीक जमीन ज्या प्रदेशात होती तो प्रदेश, धनसंपत्ती, हेही मान्य केले असते एक वेळ, पण राजकन्या सुवर्णमतीचा हात पंचमनगरीचा राजकुंवर रणराज बरोबर विवाहासाठी मागण्यात आला होता. ही बाब प्रचंड संतापजनक होती.

तहात जमीन, धनसंपत्ती मागणे हे सर्वमान्य होते.पण तहात राजकुंवारीचा हात मागणे हे राज्यासाठी प्रचंड अपमानास्पद होते.

हे सर्व गोषात बसलेली सुवर्णमतीही ऐकत होती. गोषामध्ये हालचाल झाली. सुवर्णमतीचा चेहरा संतापाने लालेलाल झाला होता. याक्षणी उठावे आणि पंचमनगरीचा राजा





व कुंवरास सरळ सरळ युद्धाचे आव्हान द्यावे हा विचार तिला स्वस्थ बसू देईना. ती उठून येरझाऱ्या घालू लागली.

राजदरबारात खलबते सुरूच होती. कोणाला काहीच सुचत नव्हते. काही वेळाने दरबार बरखास्त करण्यात आला. दूत शेजारच्या राज्यात खलिते घेऊन पाठवण्यात आले. मदतीचे आणि पंचमनगरीवर दबाव आणण्याचे आवाहन करण्यात आले. पण खात्री कशाचीच नव्हती. केवळ एकच राज्य होते जे पंचमनगरीस जरब देऊ शकत होते ते म्हणजे शेषनगरीचे राज्य. परंतु त्यांच्याकडे मदत मागावी तरी कशी? ना नात्याने त्या घराण्याशी जोडलेले, ना परिचयाने.

राजाजींच्या त्यांच्या महालात येरझाऱ्या सुरूच होत्या.सुवर्णमतीही तिथेच होती. आपल्या रूपाच्या लोभानेच पंचमनगरीचा राजकुंवर या थराला गेला असल्याचे तिला कळले होते. तिच्या अंगाचा तिळपापड होत होता.

तेवढ्यात एक गुप्त दूत राजमोहोर दाखवून आत आला. आल्याआल्याच त्याने एक खलिता महाराजांच्या हाती दिला. महाराजानी तो खलिता वाचला. पाहतापाहता त्यांची काळजीयुक्त चर्या पालटली. एक बारीक स्मितरेषा त्यांच्या ओठी सुवर्णमतीस दिसली आणि ती काहीशी आश्चर्यचकित झाली. दूतास आराम करण्यास सांगून मग राजानी खलिता सुवर्णमतीच्या हाती दिला.

खलिता शेषनगरीचे राजकुंवर सूर्यनागाकडून आला होता. ती वाचू लागली.

"आपल्या राज्यावर पंचमनगरीचे राज्य आक्रमणाच्या तयारीत आहे, ही खबर आपल्यापर्यंत पोहोचलीच असेल. त्यांच्याकडे परकीय बनावटीची आयुधे आहेत हेही आपल्यास ज्ञात असेलच. प्रसंग बाका आहेच. हे नेहमीचे दोन राज्यातील आपसी युद्ध असते, तर कदाचित मदत मागितल्याशिवाय आम्ही मध्ये पडलो नसतो. परंतु पंचमनगरीच्या राजाने मर्यादा ओलांडली आहे. युद्धसंधीत जमीन, धन, यांची देवाणघेवाण शास्त्रमान्य आहे. परंतु जुलुमाने राजकन्येचा हात मागून राजघराण्यांच्या परंपरेला काळिमा फासण्याचे कृत्य पंचमनगरीच्या राजाने केले आहे.

आपला, सर्वांनी एकत्र येऊन परकीयांना काबूत ठेवण्याचा मानस आम्हाला अत्यंत आवडला. सद्यपरिस्थितीत हेच योग्य पाऊल आहे. परंतु पंचमनगरीच्या आततायी राजास हे





समजलेले दिसत नाही. त्यांना योग्य ती समज आम्ही देऊच. वेळ पडल्यास शेषनगरीचे सैन्य पंचमनगरीच्या सैन्यास योग्य तो धडा शिकवेल. याची गरज पडेल असे वाटत नाही. खलिता एव्हाना त्यांनाही मिळाला असेलच. आम्ही लक्ष ठेवून आहोत. चिंता नसावी.

स्त्रीचा असा अपमान ना शेषनगरीचे राज्य सहन करेल ना आम्ही स्वतः. या संकटकाळी शेषनगरी तुमच्याबरोबर खांद्याला खांदा लावून उभी असेल याची खात्री बाळगा.

यापुढे मिळून राहणे अधिकाधिक गरजेचे ठरणार आहे. आपले राज्य आमच्या राज्यापेक्षा लहान असले तरी मोक्याच्या सीमेवर आहे. दोन्ही राज्यांनी मिळून आपले सैन्य अधिक बळकट करावे असे वाटते."

सुवर्णमतीने परत परत खलिता वाचला. राजाजी तिच्याकडेच पाहत होते.

"पिताजी, यांच्या रूपाने परमेश्वरच धावून आला आपल्या मदतीला. यांच्याबद्दल सगळा इलाखा आदराने बोलतो."

"खरंय कुंवारी. मी लगेच खलित्याचे उत्तर पाठवतो.ही समस्या सुटल्यावर सदिच्छा भेटीचे निमंत्रणही पाठवतो."

लगबगीने राजाजींनी मंत्रिगणांस पाचारण केले. हेरांना सर्व बित्तमबातमी काढण्यास सांगितले.

काहीच दिवसात पंचमनगरीचे सैन्य सीमेवरून मागे हटवले गेल्याची बातमी आली.

इतर सर्व राज्यांनीही पंचमनगरीस असे कृत्य केल्याबद्दल निषेधाचे खलिते पाठवले आणि परत असे काही विपरीत केल्यास गय केली जाणार नाही हेही कळवण्यात आले.





भाग १

राजवाड्यामधे सकाळपासूनच गडबड उडाली होती. महाराज आणि राणीसरकार जातीने सर्व तयारीवर बारीक नजर ठेवून होते. दिवाणजी परत परत सर्वांना सूचना देत होते. मुदपाकखान्यात मुख्य आचारी खास मेजवानीच्या तयारीला पहाटेपासूनच लागला होता. आज त्याच्यावरच्या मोठ्या जबाबदारीची त्याला पुरेपूर कल्पना होती. आणि म्हणूनच, मुदपाकखान्यातले आपले सर्व कसब, त्याने पणाला लावायचे ठरवले होते. प्रत्येक मसाल्याचा आणि इतर पदार्थ त्याने निवडून उत्तम प्रतिचा घेतला होता. खास उत्तमोत्तम आचारी आजच्या मेजवानीसाठी निवडले होते. त्याला कोणतीच त्रुटी राहू द्यायची नव्हती.

दरबार सजवण्यासाठी सुगंधी, रंगीत, लहानमोठी, सर्व प्रकारची फुले वेगवेगळ्या मळ्यातून निवडून, वेचून पाट्या भरभरून आणली जात होती. सेवक त्यांचे हार, माळा करण्यात गुंतले होते. वातावरणात मंद सुगंध भरून राहीला होता.

तलम रेशमी कशिद्याचे पडदे, महालांच्या मोठमोठ्या खिडक्यांवर झुलत होते. त्यांच्यावर मोत्यांच्या माळा झुलत होत्या. चंदन-कस्तुरीचा सुगंध पडद्यांबरोबर महालात पसरला होता.

मऊसूत रेशमी पायघड्या पसरल्या जात होत्या. रत्नजडित झुंबरं चमकवून, त्यात दीप प्रज्वलीत करण्यासाठी जय्यत तयार होते. सेवक, सेविका, आधीच्याच चमकणाऱ्या सुवर्ण, रुप्याच्या पात्रांना आणि चषकांना अधिक चमकवण्याच्या प्रयत्नात होते. निरनिराळे वादक, गायक, नृत्यांगनांना, आदरपूर्वक निमंत्रणे पाठवून बोलावून घेण्यात आले होते. सेवक, सेविकांची खास फौज, कलाकारांच्या तैनातीस हजर होती. बाहेर पन्नास हत्ती, अडीचशे अरबी घोडे, आणि निवडक सैनिक सलामीसाठी तयार होते. सगळीकडे लगबग सुरू होती.

इकडे राजकन्या सुवर्णमतीदेखील आजच्या खास पाहुण्यांच्या स्वागतासाठी सजत होती. चंदन आणि गुलाब तेलाने सेविकांनी तिच्या सर्वांगाला सौम्य मर्दन करून दिले आणि नंतर सुगंधीजलाच्या कुंडात बराच वेळ सुगंधी उटण्याने सचैल स्नान करून ती कुंडातून बाहेर





आली. सेविकांनी लगेच तिच्या नाजूक गौरांगाला तलम वस्त्रांनी लपेटून घेतले. लगोलग दुसऱ्या सेविकेने तिच्या लांबसडक केसांना सुगंधी धुरी देत सुकवण्यास आणि दुसरीने काही बटांना वळवण्यासाठी गुळगुळीत बांबूंच्या बारीक पुंगळ्यांभोवती गुंडाळण्यास सुरूवात केली. तिची रेशमी वस्त्रे, आभूषणे, आधीच काढून तयार ठेवलेली होती.

सुवर्णमती रत्नजडीत पूर्ण उंचीच्या आईन्यासमोर, साजशृंगार करण्यासाठी येऊन, शिसवी मेजावर बसली आणि स्वतःच्याच आरस्पानी सैंदर्याकडे पाहत राहिली.

गुलाबी तेजस्वी आरस्पानी त्वचा, चाफेकळी नाक, गुलाबांच्या पाकळ्यांना लाजवतील असे नाजूक लालसर गुलाबी ओठ, धनुष्याकृती भुवयांच्या खाली रेखीव, निळसर झाक असलेले, काळे डोळे, आणि असंख्य स्वप्नांना आत अलगद दडवणाऱ्या लांबसडक पापण्या. सटवीने विनासायास भाग्य लिहावे असे तेजस्वी कपाळ, त्यावर खट्याळपणे उडणाऱ्या काळ्याभोर बटा. अतीयोग्य उंचीची बारीक मान . तितकीच योग्य तिची स्वतःची उंची. अतिशय प्रमाणबद्ध बांधा. लांबसडक बोटांनी आधीच्याच सुंदर चेहऱ्याला अधिक उठावदार बनवण्यास सुवर्णमतीने सुरूवात केली.

सुवर्णमती.... राजा सुरजप्रतापसिंह आणि राणी चारुलतादेवी यांची एकुलतीएक लाडकी राजकन्या. संपूर्ण राज्याची एकमेव वारस. नुसतीच सौंदर्यवती नव्हे तर गुणवतीही. लहानपणापासूनच घोडसवारी, बंदूकबाजी, याचे धडे खास निपुणांकडून गिरवले होते तिने. मैदानी नैपुण्य तर होतेच पण त्याहूनही अधिक तल्लख होती बुद्धीमत्ता. राजा सुरजप्रताप सिंहांची मुत्सद्देगिरीची अनुवंशिक देणगी मिळाली होती तिला. चारुलतादेवींच्या खानदानी सौंदर्याबरोबरच राजघराण्यातील स्त्रियांचे पिढीदरपिढी चालत आलेले चातुर्य तिच्यात पुरेपूर उतरले होते. त्या काळात एकट्या राजकन्येने परदेशी जाऊन शिक्षण घेणे शक्य नव्हते, परंतु पिताजींकडून वारंवार होणारी विलायतेतली वर्णने तिच्या सक्षम बुद्धीने योग्य प्रकारे टिपली होती. एवढेच नव्हे तर परकीय भाषा शिकून तिथल्या कायद्यांचा, राजघराण्यांच्या इतिहासाचा, साहित्याचा, संस्कृतीचा अनौपचारीक अभ्यासही तिने सुरू ठेवला होता. वयाच्या विसाव्या वर्षीच एखाद्या सम्राज्ञीचा आब तिच्यात होता.

राजा सुरजप्रतापसिंहांबरोबर ती नेहमी राजदरबारातील खास स्त्रियांसाठीच्या दालनात हजर असे. तिथला राज्यकारभार, ते डावपेच, ती मुत्सदी धोरणं, तिथे होणारे निर्णय, हे तिला





विलक्षण आवडत. राजा सुरजप्रतापसिंहांनीही तिची ही आवड आणि त्यातील गती ओळखून, तिला राजदरबाराचे कामकाज गोषाआडून का होईना अनुभवण्याची अनुमती दिली होती. पाहतापाहता ती राजाजींचे अधिकचे डोळे आणि कान बनली होती. राजदरबारात घडणाऱ्या कामकाजाविषयी रोज रात्री त्यांच्या चर्चा, हा राजांसाठी एक आनंददायी काळ बनून गेला होता. स्वत:च्या लेकीविषयी वाटणाऱ्या कौतुकाने लवकरच आदराची जागा घेतली होती. हळूहळू ते महत्वाच्या निर्णयाच्या वेळी तिचे मत विचारू लागले होते. राजदरबारी मात्र याविषयी पूर्ण अनभिज्ञ होते. एका स्त्रीने, तेही इतक्या लहान वयातील राजकन्येने, राजदरबाराजाच्या कामकाजात मत द्यावे हे त्या काळातील दरबारातील मंत्रीमंडळाला पचनी पडणे अवघड गेले असते याची कल्पना राजाना होती. 'बेटी पराया धन', या मताचेच ते असणार यात शंका नव्हती.

विणकाम, चित्रकला या सर्वसाधारणपणे त्या काळातील राजकन्यांच्या आवडीच्या विषयांमध्ये तिला विशेष रुची नव्हती. पण पद्धत म्हणून ती तेही शिकली होती.

राजाजींना अनेकदा सुचवूनही दत्तकविधान करण्यास त्यांनी कधीच होकार दिला नाही. त्या काळात अत्यंत प्रचलित असूनही, पुत्रप्राप्तीसाठी दुसरा विवाह करण्यासही त्यांनी ठाम विरोध केला होता. राणी चारुलतादेवी हे मनोमन जाणून होत्या.

राजकन्येचा विवाह झाला, की जमाईराजा आणि तदनंतर नातवाच्या रूपात राज्याला पुढील वारस मिळणार असे बोलले जाई. आणि आता ती वेळ आली होती. कन्या उपवर झाली होती.

पाहतापाहता सफाईदारपणे सौंदर्यप्रसाधनांचा वापर लक्षातही येणार नाही अशा पद्धतीने करत आधीच्याच सुंदर मुखावर तिने उठावदार कळा आणली. तितक्याच सफाईने रेशमी वस्त्र परिधान करून ती आभूषणांकडे वळली. तिच्या कपाळावर, एक कळतनकळत आठी उमटली. लतिके, ही कोणती आभूषणे काढलीस? आज काही विवाह समारंभ नाही.

लतिकेने भराभर भारी भक्कम सुवर्णलंकारांची पेटी बाजूला काढली आणि पुढच्या आज्ञेची वाट पाहू लागली. सुवर्णमतीने मोत्याच्या दागिन्यांची पेटी मागवली. महाराज





विलायतेस गेले असता त्यानी खास विलायती पद्धतीचे अलंकार बनवून आणले होते सुवर्णमतीसाठी. तिने ते मोजके नाजूक अलंकार परिधान केले. गळ्यात नाजूक हिरेमोत्यांनी बनवलेला हार, कानात तशीच कर्णफुले, तिचे डावे नाजूक मनगटही तशाच नाजूक चापात कैद झाले. दुसऱ्या मनगटात मात्र तिने अत्यंत बारीक कलाकुसरीची सुवर्णकंकणे चढवली, इतकी नाजूक की त्यांची हाताच्या हालचालीबरोबर होणारी मधूर किणकिण नेत्रांबरोबर कर्णांनाही सुखावू लागली. केसात तसल्याच नक्षीचा चाप बसवून बाकी लांबसडक केशसंभार तिने मोकळा सोडला. चालताना हा पाठीवरून खाली नितंबांपर्यंत रुळणारा केशसंभार कसा परिणाम साधेल याची तिला चांगलीच जाणीव होती. सर्व जामानिमा झाल्यावर विलायती मंद सुगंधी अत्तर लावून ती आईन्यासमोर उभी राहिली, आणि स्वतःच्याच प्रतिमेवर बेहद्द खुश झाली. ही खुशी स्वतःच्या सौंदर्यापेक्षा आज होणाऱ्या अपेक्षित परिणामाची अधिक होती.





# भाग २

आजचा दिवस होताच तसा विशेष! कन्या उपवर झाली की सर्व मायबापाना असते तशी हुरहूर महाराज आणि राणीसरकारांनाही होती. पोटची एकुलती एक सौंदर्यवती, गुणवती, कन्या, तिच्या रुपाला, बुद्धीमत्तेला साजेसा अनुरूप वर मिळणे गरजेचे होतेच, पण त्याचबरोबर या राज्याची चढती कमान तशीच उत्तुंग ठेवायला लायक असा जमाईराजाही राज्याला हवा होता. महाराजांना आपल्या कन्येच्या कुवतीचा आणि महत्वाकांक्षेचा अंदाज आणि अभिमान दोन्ही होते. परंतु जनतेला "राजा" हवा असतो राज्यकर्ता म्हणून, हेही ते जाणून होते. अनेकांनी सुचवूनही दत्तकविधान करण्याचा विचारही त्यांच्या मनाला शिवला नव्हता तो केवळ सुवर्णमतीच्या अफाट बुद्धीमत्तेवरच्या असलेल्या त्यांच्या विश्वासावर.

आज राजे शेषनाग त्यांच्या पत्नी आणि दोन पुत्रांसह गंगानगरीत येणार होते खास पाहुणे म्हणून. वर वर पाहता, ही एक सदीच्छा भेट असली तरी अनेक सूप्त हेतू या भेटीमागे दडले आहेत हे एक उघड गुपित होते.

राजे शेषनाग यांचे राज्य सर्वच बाबतीत गंगानगरीच्या राज्यापेक्षा उजवे होते. राज्याच्या सीमा पाचपट मोठ्या होत्या. सैन्यबळ कमीतकमी यांच्यापेक्षा चौपट होते. संपत्तीचा तसा अंदाज बांधणे शक्य नसले, तरी सीमांतर्गत असणाऱ्या सुवर्णरुप्याच्या खाणी असणे एवढेच पुरेसे होते. परंतु गंगानगरीशी सोयरीक म्हणजे राज्याची एक सीमा सुरक्षित असे सरळ गणित होते.

अलिकडच्या काळात सैन्य हे तसे मानापुरतेच उपयोगाचे ठरत होते. परकीयांशी दोन हात करणाऱ्या राज्यांची झालेली अवस्था पाहता, त्यांच्याशी मुत्सद्दी हातमिळवणी करून शक्य ते सर्व हक्क आपल्याकडे ठेवून घेण्याचे धोरण दोन्ही राज्यांनी ठेवले होते. यांच्या राज्याच्या सीमा मोक्याच्या ठिकाणी असूनही अजून तरी परकीय फौजा यांच्या राज्यात ठाण मांडण्यास आल्या नव्हत्या. इथल्या संपत्तीची म्हणावी अशी हाव परकीयांना पडली नव्हती. किंबहुना त्यांना त्याची कल्पनाच नव्हती. या दोन राज्यांचा मिलाफ दोन्ही राज्यांना अधिक मजबूत बनवणार होता.



राजे शेषनागांना तिन्ही पुत्रच. थोरले राजकुंवर शंखनाग, रुप राजबिंडे, वृत्तीही राजस. त्यांचा विवाह चंद्रनगरीच्या राजाची सुस्वरूप कन्या सौमित्रेशी काही वर्षांपूर्वी झाला होता. मित्रमंडळींबरोबर शिकारीस जावे, रात्री गायन वादन नृत्य अशा मनोरंजनात घालवाव्यात, कधी मनी आले तर वडिलांच्या आग्रहाखातर राज्यकारभारात थोडेफार लक्ष घालावे असा एकंदर नूर. पत्नीही सर्वच बाबतीत शंखनागांच्या 'हो' ला 'हो' करणारी. एकूणच राजे शेषनागाना ज्येष्ठ पुत्राने काहीसे निराश केले होते.

दुसरे राजकुंवर सूर्यनाग. भरपूर उंची, रुंद खांदे, मजबूत बांधा, काहीसा सावळा वर्ण, तीक्ष्ण नजर. पाहताक्षणी राजपुत्र कमी, आणि योद्धा जास्त वाटावे असे व्यक्तिमत्व. परंतु कमालीची अफाट बुद्धीमत्ता. डोळ्यातली चमक त्याची ग्वाही द्यायची. लहानपणापासूनच राज्यकारभारात प्रचंड रस आणि गतीही. मुत्सद्देगिरीत हातखंडा. न्यायशास्त्राची उत्तम जाण. लहान वयातच आपल्या बुद्धीमत्तेची चुणूक दाखवून दरबारी दबदबा निर्माण केला होता त्यांनी. आता कोणताही निर्णय, राजे शेषनाग, सूर्यनागाशी मसलत केल्याखेरीज घेत नसत. शेषनागाचें मंत्रिमंडळ आणि प्रजाजन सूर्यनागांकडेच भावी राजा म्हणून पाहत, यात नवल काहीच नव्हते. जितके मुत्सदी, तितकेच गोरगरीब जनतेसाठी कनवाळू, आणि युद्धभूमीवर शत्रूसाठी कर्दनकाळ अशी त्यांची ख्याती होती. कर्णोपकर्णी ती ख्याती गंगानगरीच्या राजदरबारी येऊन पोहोचलीच होती. पंचमनगरीच्या आक्रमणादरम्यान त्यांने केलेली मदत गंगानगरी कधीच विसरणार नव्हती.

जेव्हा सुवर्णमती उपवर झाल्याची आणि राजे सुरजप्रतापसिंह लेकीसाठी सुयोग्य वर शोधत असल्याची बातमी कानी आली तेव्हा राजे शेषनाग सरळ सरळ सूर्यनागाचा विवाहप्रस्ताव घेऊन राजदूत पाठवण्याच्या तयारीत होते, तेवढ्यात गंगानगरीहून सदिच्छाभेटीच्या निमंत्रणाचा खलिता आला. मग सूर्यनागाने त्यांना रोखले, सरळ विवाह प्रस्ताव न पाठवता, चौघांच्या सदीच्छाभेटीचा प्रस्ताव पाठवावा, आपण दोघे, माता आणि धाकटे राजकुंवर चंद्रनाग, असे पित्यास सुचवले.

राजा शेषनाग एकाचवेळी पुत्राच्या हुशारीस मनोमन दाद देते झाले आणि त्याचवेळी, या सगुणी परंतु सावळ्या रुपाच्या राजकुवंरासाठी त्यांचे मन भरून आले. सूर्यनागाचा, धाकट्या बंधूस तेथे नेण्याच्या प्रस्तावाचा अर्थ न कळण्याइतके राजे दुधखुळे नव्हते. सुवर्णमतीच्या स्वर्गीय सौंदर्याची तारीफ एव्हाना सर्वत्र पसरली होतीच. न जाणो आपले सावळे

रूप पाहून हा विवाह होऊ शकला नाही, आणि इतर कोणत्याही राजघराण्याशी सुवर्णमतीचा विवाहसंबंध जुळून आला, तर शेषनगरीच्या राज्याला कायमचा एका हददीकडून धोका राहाणार होता. परकीयांची सध्याची चाल पाहता, चारी दिशाना आपलीच मित्रराज्ये असणे केव्हाही हिताचे ठरणार होते. त्यादृष्टीने धाकटा चंद्रनाग हुकुमाचा एक्का ठरणार होता.

धाकटा राजकुंवर चंद्रनाग, अत्यंत देखणा, गोरा तजेलदार वर्ण, धारदार नाक, पाणीदार डोळे, भरपूर उंची, रुंद खांदे, भरदार छाती, कमावलेली उत्तम शरीरयष्टी. उत्तम बुद्धीमत्ता. सर्व प्रकारच्या मैदानी खेळात प्राविण्य. तरूण वयास शोभणारा काहीसा उताविळपणा, त्यांच्या आकर्षकतेत भरच घाली. विलायतेत शिक्षण घेऊन आल्याने एक वेगळाच, चालण्याबोलण्यातला आत्मविश्वास होता.

गंगानगरीच्या जनतेने मनोमन यांना आपला भावी राजा म्हणून सहज स्विकारले असते आणि सुवर्णमतीस आपला भावी पती यांच्यात नक्कीच दिसला असता, हा सूर्यनागाचा कयास शेषनागांच्या लगेच लक्षात आला. क्षणभर, चंद्रनागास नेण्यास विरोध दर्शवावा असेही मनी आले. पण अर्थातच बापावर राज्यकर्त्याने कुरघोडी केली आणि सूर्यनागाने सुचवल्याप्रमाणे चौघांच्या सदीच्छा भेटीचा प्रस्ताव गंगानगरीस रवाना झाला. प्रस्तावाचे अर्थातच गंगानगरीच्या राजाकडून स्वागतच झाले आणि पाहतापाहता आजचा दिवस उगवला होता.

भाग ३

खाशा स्वाऱ्या वेशीनजीक येऊन पोहोचल्या आहेत आणि लवकरच महालापर्यंत पोहोचतील अशी दिवाणजींची वर्दी घेऊन खास दूत पोहोचला आणि एकच गडबड उडाली. महालातील सर्व दीप प्रज्वलित करून, झुंबरे वर चढवली गेली. वादक, गायक, आपापल्या नियोजित जागी स्थानापन्न झाले. दशसुवासिनी औक्षणासाठी मुख्य प्रवेशद्वाराजवळ सज्ज झाल्या. मुख्य प्रवेश द्वारापासून महालापर्यंत पसरलेल्या पायघड्यांच्या बाजूने उभारलेल्या उंचवट्यांवर, सेविका, सुगंधित पुष्पांची, गुलाबजलांची पात्रे घेऊन, खाशा पाहुण्यांवर हलकेच वृष्टी करण्यासाठी जय्यत तयारीत उभ्या राहिल्या. फळे, पेय, मिष्टपदार्थांची तबके, श्वेत जाळीदार वस्त्रांनी झाकून तयार ठेवण्यात आली. विलायती पद्धतीप्रमाणे चहापानाचीही व्यवस्था चोख ठेवण्यात आली. खुद्द राजे आणि राणीसरकार मुख्य दरवाजाजवळच्या दालनात स्वागतासाठी जाऊन थांबले.

सुवर्णमतीसदेखील सेविका सांगावा घेऊन गेली. तिच्या जमलेल्या सख्यांमधे एकच उत्साहाची लाट पसरली. त्या सुवर्णमतीस अदबीनेच का होईना, पण छेडू लागल्या. सुवर्णमतीच्या मंद स्मितहास्यामागे तिच्या मनात नक्की काय चालले आहे याची जराही कल्पना तिच्या सख्यांना येणे शक्य नव्हते! त्यांची ती कुवतही नव्हती.

आतून ती स्तब्ध होती. कोणताही महत्वाचा क्षण हा तिच्यासाठी एक प्रकारचे ध्यान असे. मग आंतरिक स्तब्धतेत तिने ठरवलेल्या मार्गानेच घटना घडत जाताना पाहणे, ही पराकोटीची आनंददायी गोष्ट असायची तिच्यासाठी.

आजही तसेच घडणार याविषयी तिच्या मनात तिळमात्र शंका नव्हती. हा क्षण तिच्यासाठी फार फार शांततेचा, स्तब्धतेचा होता.

खाशा स्वाऱ्या विलायती मोटरगाड्यातून पधारल्या. दिवाणजींनी स्वत: पुढे होऊन राजे शेषनाग आणि राणीसाहेबांच्या गाडीचे दरवाजे उघडले. दुसरी गाडी स्वत: चंद्रनागच चालवित आले होते. सेवकांनी पुढे होऊन दरवाजा उघडेपर्यंत, चंद्रनाग बाहेर पडलेदेखील. पाठोपाठ सूर्यनागही उतरले. चौघेही पायउतार झाले. राजे स्वत: स्वागतास पुढे सरसावले. पाठोपाठ राणीसरकार होत्याच. जमलेल्या प्रजाजनांनी दोन्ही राजांच्या जयजयकारास सुरूवात केली. सैनिकांनी बंदुकीचे बार काढून सलामी दिली आणि हत्तीनी माहुतांच्या हुकुमाबरोबर सोंडा वर उचलून चित्कारासह सलामी दिली. घोडेस्वारांनी चुचकारताच घोड्यांनीही जागच्या जागी





दुडक्या चालीची करामत करत सलामी दिली. खाशा स्वाऱ्या या खेळाने मनापासून प्रसन्न झाल्या.

दोन्ही राजांनी आणि राण्यांनी एकमेकांना आलिंगन दिले. राजकुवरांनी अदबीने वाकून आदर दर्शविला तेव्हा सुरजप्रतापांनी प्रसन्नपणे दोघांनाही एकदमच आलिंगन दिले. सर्व मुख्य प्रवेशद्वाराकडे निघाले. चंद्रनाग दुरूनही उठून दिसत होता.

चंद्रनागास आपल्या मर्दानी सौंदर्याची पुरेपूर जाण आणि अभिमान होता. तो त्याच्या चालीतूनही स्पष्ट दिसत होता. सूर्यनागास या असल्या बाह्यदर्शी बाबतीत कधी रसच नव्हता आणि त्याकडे लक्ष देण्यास वेळही. तो अत्यंत सहजगतीने चालत, राजमहालाचे, आसपासच्या परिसराचे निरीक्षण करत होता. सूर्यनाग मुद्दामच चंद्रनागाच्या काही पावले मागे चालत होता. त्याने ठरविलेला निर्णय घडवून आणणे अत्यंत महत्वाचे होते आणि तो हा खेळ व्यवस्थितच रचवणार होता.

प्रजेचा जयजयकार सुरूच होता. पायघड्यांवरून स्वाऱ्या निघाल्या तसे वादकांनी मंजुळ वाद्ये वाजवण्यास सुरूवात केली. गायकांनी मंद स्वरात आलाप आळवायला सुरूवात केली. वरून गुलाबजल आणि पुष्पवृष्टी सुरूच राहिली. मंडळी खास महालात पोहोचली. सुवर्णमती आधीच जवळच्या दालनात येऊन थांबली होती. तिच्या सख्या क्षणाक्षणाचा वृतांत तिला येऊन सांगत होत्या. त्यांच्या बोलण्यात सतत देखण्या राजकुंवराचा विषय येत होता. त्याचे गौरवर्णीय देखणे रूप, अत्यन्त दिमाखदार चाल, याचीच वर्णने त्या राजकुंवारीला सांगत होत्या. तिने गवाक्षातून पाहिले तेव्हा तिची नजर मात्र तीक्ष्ण नजरेने सर्व गोष्टींचे निरीक्षण करणाऱ्या सूर्यनागावर स्थिरावली. त्याची योद्ध्यासारखी शरीरयष्टी, सतत सावध पवित्रा, तिच्या नजरेत ठसला.

मंडळी पोहोचल्याबरोबर, सेवक, सेविकांनी चौघांसमोर पाय धुण्यासाठी चौरंग मांडले. पायातील भरजरी जोडे काढण्यासाठी हळूवारपणे पाय उचलून चौरंगी ठेवले. जोडे बाजूला घेऊन छोटे घंगाळ चौरंगी मांडण्यात आले. सेवक, सेविका गरम सुगंधी पाण्याने तळपायांस हळूवार मर्दन करू लागले. मग घंगाळी उचलून पायांखाली चौरंगावर मखमल पसरून तळपाय कोरडे करण्यात आले. हळूवारपणे मखमली जोड्यात तळपाय सरकवून सेवक सेविका तिथून सामान उचलून बाहेर निघाले. याचवेळेस दुसरे सेवक सेविका हस्तप्रक्षालनासाठी दुसऱ्या बाजूस सज्ज होतेच. हस्तप्रक्षालन झाल्यावर सुवर्णमतीस निरोप गेला. ती अधोवदना हलकेच कक्षात दाखल झाली.





भाग ४

तिच्या नाजूक कंकणांनी आधीच तिच्या येण्याची वर्दी दिली. नकळत सर्वांच्याच नजरा प्रवेशद्वारावर आधीच खिळल्या होत्या. सुवर्णमतीचे पहिले पाऊल आत पडताच दोन्ही कुंवर, झटकन आसनावरून उठून उभे राहिले. यात शिष्टाचाराचा भाग किती आणि सुवर्णमतीच्या सौंदर्याचा किती, हे त्यांचे त्यांनाही सांगणे जमले नसते. सुवर्णमतीच्या सौंदर्याची ख्याती आधीच त्यांच्यापर्यंत पोहोचली होती, पण तरीही, समोर जी स्वर्गीय सौंदर्यखणी उभी होती तिला पाहताच आपण जे वर्णन ऐकले, ते किती अपूरे आणि तोकडे होते असेच त्या चौघांनाही वाटले. सूर्यनाग क्षणभर अवाक होऊन, तिच्या तेजस्वी सुंदर मुखाकडे पाहतच राहिला. एक अत्यंत अनोखी लहर त्याच्या शरीरभर उमटली. मनोमन 'हीच ती, जिची छबी तारुण्यात प्रवेश केल्यापासून आपल्या मनाच्या दर्पणात सहचारिणी म्हणून उमटत होती', अशी खात्री पटली, आणि दुसऱ्याच क्षणी, आपण काय ठरवून आलो होतो, त्याचे महत्व, आपले राज्य, आपले कर्तव्य हे सर्व आठवून, ही आपल्याला नाहीच म्हणाली असती, हीदेखील खात्रीच पटून, एक अत्यंत गहिरी वेदना त्याच्या नजरेत साठून आली.

चंद्रनागाची अवस्था फारशी निराळी नसली तरी, एक सुंदर स्त्री समोर आल्यावर वाटावा तो आनंद एवढाच त्यात भाग होता. विलायतेत असता तर चंद्रनाग तिचा तळहात हाती घेऊन तो चुंबण्यासाठी नक्कीच पुढे आला असता. पण इथली गोष्टच निराळी होती.

सूर्यनागाच्या डोळ्यात क्षणभरच एक वेदनेची रेष तरळून गेली, अर्थात इतर कुणालाच ते जाणवू न देण्याचे कसब त्यास नक्कीच अवगत होते. शेषनागाच्या नजरेतून मात्र ते सुटले नाही. यावेळेस आपण सूर्यनागाचे ऐकावयास नको होते असा क्षणिक विचार त्यांच्या मनास चाटून गेला. पण क्षणभरच.

दोन्ही राजे एकमेकांकडे पाहून सूचक हसले. सुवर्णमती हलकेच चालत आपल्या मातापित्याकडे गेली आणि त्यांनी खुणावताच पुढे होऊन राजे शेषनाग आणि राणीसरकारांपुढे अभिवादनासाठी झुकली. राणीसरकारांनी वरचेवरच तिला खांद्यास धरून उठविले. दोघांनीही तिला, “आयुष्यमान भव" असा तोंड भरून आशीर्वाद दिला.

त्यांच्याबरोबर आलेल्या सेवकांनी, नजराण्याची तबके समोर आणली. राणीसरकारांनी, माणिक आणि पाचूजडित हार असलेली, लाकडी खास रंगीत नक्षीकाम केलेली पेटी,



सुवर्णमतीच्या हातात दिली. सुवर्णमतीने एक कटाक्ष, जणू संमतीसाठी, आपल्या मातेकडे टाकला आणि मग स्वीकार केला.

राजा शेषनागांनी मग आपल्या पुत्रांचा परिचय सुवर्णमतीस करून दिला. प्रथम सूर्यनागाचा, तिने हात जोडून त्यास अभिवादन केले, तेव्हा तिच्या चेहऱ्यावर एक प्रसन्न स्मित उमटले. सूर्यनागानेही हात जोडले, आणि लगेचच त्याने चंद्रनागाकडे हात केला. चंद्रनागाचा परिचय करून देताच चट्कन त्याचा हात हस्तांदोलनासाठी पुढे आला पण सुवर्णमतीचे हात जोडलेलेच होते, त्यामुळे त्यानेही सावरून घेत हात जोडले.

सुवर्णमतीस सूर्यनागाची ही थंड प्रतिक्रिया खेदाश्चर्यात टाकून गेली. आजतागायत कोणत्याही तरुण पुरुषांकडून इतका थंड प्रतिसाद तिला मिळाला नव्हता. आणि ज्या व्यक्तीकडून असा प्रतिसाद अपेक्षित नव्हता त्या व्यक्तीकडूनच तो आल्यावर तिच्या मनात खळबळ माजली. परंतु तसे मुखावर किंचितही दिसू न देता सुवर्णमतीने, स्वत: सर्वांना केशरी सरबताचे चषक दिले. सूर्यनागाने हातानेच नको म्हणताच "खास वाळाकेशराचे सरबत आहे, प्रवासाचा शीण लगेच कमी करेल" असे म्हणत आग्रहाने त्यास घ्यायला लावले. सूर्यनाग या वैयक्तिक आग्रहाने मनोमन सुखावला. चंद्रनागाने चहा घेण्यास संमती दर्शवताच, सुवर्णमतीने अगदी विलायती पद्धतीने चहा बनवत शर्करेचे प्रमाण विचारले. त्याने चतुराईने, "तुझा हात यास लागला आहे तर शर्करेची काय गरज" अशी विचारणा, फक्त तिलाच ऐकू जाईल अशी केली. सुवर्णमतीचा गोरामोरा झालेला सुंदर मुखडा पाहत आपण एक गुण मिळवल्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसला.

सुवर्णमतीच्या डोळ्यातही एक खास चमक होती. खेळ रंगणार होता. विजय ती मिळवणारच होती पण आता विजय मिळाल्यानंतरची खुमारी वाढणार होती यात शंका नव्हती.





भाग ५

यथावकाश भोजन झाले. चंद्रनाग आपल्या सहज शैलीने, सर्वांना विलायतेतील गमती सांगत राहिला, सुवर्णमती मोठे मोठे डोळे करत, मोठ्या उत्सुकतेने ते ऐकत राहिली. चंद्रनाग स्वतःवर खुश होत राहिला. सूर्यनाग अधिकाधिक स्वतःच्या कोषात गुरफटत राहिला. शेवटी दिवस कलला. सर्वजण आपापल्या कक्षात विश्रांतीसाठी जाऊ लागले. सुवर्णमतीही आपल्या कक्षात निघाली. वाटेतच सूर्यनागाचा कक्ष होता. तो अजून बाहेरच उभा दिसला. लांबूनच त्याची उंच आकृती दिसताच तिची पावले थबकली. सुवर्णमती क्षणभर घुटमळली. 'बोलावे की तसेच पुढे जावे?'

मग थांबून म्हणाली "काही हवे होते का आपणास? सेवक कुठे दिसत नाहीत, पाठवून देते कोणास लगेच, "

तेव्हा सूर्यनाग म्हणाला, "नाही, त्याची आवश्यकता नाही, मीच पाठवून दिले सर्वांस. मला विशेष सेवकांची गरज भासत नाही. "

सुवर्णमतीने त्यावर स्मित करत म्हटले, "आपल्या सादगीबद्दल बरंच ऐकलं होतं, पण आपण तर त्याहूनही साधे आहात. शास्त्र सांगते सादगी हे उत्तम चारित्र्याचे लक्षण. आमच्या राज्यावर झालेल्या आक्रमणादरम्यान आपण जो न्यायाच्या बाजूने पवित्रा घेतलात, आपल्या मनातील स्त्रीयांविषयीचा आदर पाहून आमच्या मनातील आपल्याविषयीचा आदर अधिकच दुणावला. आपले आभार कसे मानावेत हेच आम्हास कळत नाही. आपले राज्यकारभारातील कर्तृत्व सर्वज्ञात आहे, आणि न्यायशास्त्रातील आपले ज्ञान सर्वश्रुत आहे. आपणामुखे प्रत्यक्ष त्याविषयी काही ऐकावयास मिळेल अशी आशा धरून होतो आम्ही."

सूर्यनाग सुखदाश्चर्याने पाहतच राहिला. याची अजिबातच अपेक्षा नसल्याने, आणि तरुण स्त्रीशी फारसा संबंध न आल्याने काय बोलावे ते न सुचून तो पुरता गोंधळून गेला. पण मग एकदम गडबडून जात सुवर्णमती खाली मान घालून म्हणाली, "आम्हाला त्यातले फारसे काही कळते असे नव्हे, पण ऐकावयास आवडते. माफी असावी, आपण प्रवासाने आधीच शीणला असाल, दोन घटिका स्वस्थ स्वतःबरोबर घालवायच्या असाव्यात आपणास, आम्ही मात्र काहीतरी पोरकट वक्तव्य करीत बसलो. निघतो आम्ही."





आता अधिकच गोंधळून गडबडून जात सूर्यनाग म्हणाला "राजकुमारी आपणच मला माफ करा. आपल्या सारख्या सुंदरीला, .... "असे म्हणून तो अधिकच गडबडला, काय बोलावे हे न कळून गोंधळला, मग सावरून घेत म्हणाला, "म्हणजे मला असं म्हणायचं होतं की आपल्या वयाच्या राजकुंवारीला याविषयांमधे रस असेल असे वाटले नव्हते. म्हणून आश्चर्य वाटले एवढेच. आता बराच उशीर झाला, उद्या आपणासोबत याविषयी चर्चा करण्यास आम्हास नक्की आवडेल."

यावर सुवर्णमतीने अतिशय गोड असे स्मित करत मान हलवून संमती दर्शवली आणि निरोप घेऊन ती निघाली, पण सूर्यनागाच्या मनात कायमचे घर करूनच. उद्या राजकुंवारीकडे संपूर्ण लक्ष पुरवण्याचे त्याने ठरवले.

दुसऱ्या दिवशी वनभोजनाचा कार्यक्रम ठरवला होता. त्यानिमित्ताने राज्याचा फेरफटकाही होईल आणि काही घटका निसर्गाच्या सानिध्यात चांगल्या व्यतीत होतील असा बेत होता. आज मात्र सुवर्णमतीने पूर्ण पुरुषी पोषाख केला. तयार होऊन ती बाहेर आली तेव्हा सर्वांचीच नजर तिच्यावर खिळून राहिली.

मग वातावरण हलके करण्याच्या दृष्टीने ती म्हणाली “आम्ही तिघे, काही सख्या आणि सैनिक मिळून घोड्यावरून पुढे जाऊ. आपण चौघांनी मोटरगाडीने यावे. त्या योगे आमचाही घोडसवारीचा सराव होईल.” दोन्ही राजांनी संमती दर्शविली.

सूर्यनागास हे कोडे उलगडत नव्हते. घटकेत लाजरी बुजरी, क्वचित एखादाच शब्द बोलणारी नाजूक राजकन्या, तर घटकेत आपल्या राज्यकारभाराची सरळ तारीफ करत चर्चेस आमंत्रित करणारी विदुषी, आणि आता निर्भीडपणे सर्वांसाठी निर्णय घेऊन मोकळी होणारी आणि तो निर्विवादपणे योग्यच वाटावयास लावणारी, पुरुषी पेहेरावातही सर्वांच्याच नजरा खिळवून ठेवणारी ही सुवर्णमती, यातली नेमकी खरी कोणती? पण हिची सर्वच रुपे लोभस आहेत एवढं मात्र खरं.

त्याच्या मनात हे असे विचार चालू असताना चंद्रनाग तिच्याशी बोलू लागला. अगदी खाजगी आवाजात ती किती सुंदर दिसत आहे याचे कौतुक त्याने केले. सूर्यनागाकडे तिने एक कटाक्ष टाकला. तो आपल्याच विचारात मग्न दिसताच, तिचे मन थोडे खट्टू झाले. तेवढ्यात





सूर्यनागाची नजर यांच्याकडे वळल्यावर मात्र तिने चंद्रनागाशी हसून बोलायला सुरूवात केली. प्रथम त्याने केलेल्या तारीफेने आपण अगदी अवघडून गेलो आहोत असे किंचित लाजत तिने सांगितले. मग त्याच्याबरोबर बोलत ती महालातून बाहेर आली. हे पाहून सूर्यनागाच्या ह्रदयात एक बारीक कळ आली. 'हिच्याबरोबरचे आयुष्य हे नेहमीच उत्कंठावर्धक असेल. चंद्रनाग भाग्यवान आहे मोठा.'

'आपण चूक तर नाही ना केली चंद्रनागास इथे आणून?' शेषनागाना राहून राहून वाटत होते. पण गंगानगरीचे राज्य इतर कोणाच्याही अधिपत्याखाली जाणे शेषनागाच्या राज्याला धोकादायक होते. गंगानगरीच्या पलीकडच्याच राज्यात परकीय येऊन ठेपले होते. गंगानगरीसारख्या लहानशा राज्याला धाक दाखवून पटकन आपल्या कह्यात करणे त्यांना सहज शक्य होते. पण शेषनागांचे राज्य आणि गंगानगरी यांच्या सीमा जोडल्या गेल्या तर ताकद वाढणार होती. चंद्रनगरीची सीमा आधीच जोडली गेलेली होती.

परकीयांबरोबर सरळ वैर पत्करणे अवघडच, परंतु शक्य होईल तोपर्यंत त्यांना मित्रत्वाच्या सीमेत रोखणे हेच धोरणी ठरणार होते.

उद्या या विषयावर सुरजप्रतापसिंह , शेषनाग, आणि सूर्यनाग यांच्यात, ही गुप्त चर्चा ठरलीच होती. चंद्रनाग परदेशात राहून आल्याने तिथले रीतीरिवाज , भाषा उत्तम प्रकारे जाणत होता. सूर्यनागानेही, ही परदेशी भाषा अवगत केली होती. ही काळाची गरज त्याने ओळखली होती. पण सुवर्णमतीनेही ती गरज ओळखून परदेशी भाषा आणि संस्कृतीचा अभ्यास केला असल्याचे त्याला माहित नव्हते.





## भाग ६

घोडसवार निघाले. सर्वात पुढे सुवर्णमती होती. पाठोपाठ चंद्रनाग, सूर्यनाग, त्यांच्यामागे सख्या, सेविका आणि सैनिक काही अंतर ठेवून निघाले. राजे आणि राण्याही निघाले, परंतु ते प्रथम नगराचा फेरफटका मारून मग वनी पोहोचणार होते. जरा पुढे गेल्यानंतर सुवर्णमतीने सूर्यनागाकडे एक कटाक्ष टाकला. तो परिसराचे बारीक निरीक्षण करण्यात गुंतल्याचे तिला दिसले. किंचित दुखावलेल्या अहंकाराने, तिने चंद्रनागास शर्यत लावण्यास सांगितले. तोही ताबडतोब तयार झाला. सूर्यनाग सर्व बोलणे ऐकत होता, पण तो काहीच बोलला नाही. सुवर्णमतीने घोड्यास टाच दिली. चंद्रनागानेही घोड्यास टाच दिली. वेग वाढत गेला. सर्वांमधे आणि या दोघांमधले अंतर वाढत गेले.

सूर्यनाग त्यांच्याबरोबरीने किंवा खरंतर त्यांच्या पुढे, जाऊ शकत होता, पण जाणीवपूर्वक तो थोडे अंतर राखून निघाला. मनातून त्याची तगमग होत होती. पण सुवर्णमतीने त्याला नव्हे तर चंद्रनागास शर्यतीबद्दल विचारले, ही बाब तो विसरू शकत नव्हता. या शर्यतीतील जीत तिच्या हृदयापर्यंत सरळच घेऊन जाणारी जीत असेल हेही तो जाणून होता. आपण ती शर्यत सहज जिंकू शकतो हेही त्याला माहित होते. पण सुवर्णमतीचा कल चंद्रनागाकडे असेल तर त्यात बाधा येऊन चालणार नव्हती. त्याला सुवर्णमती मिळण्यापेक्षाही, गंगानगरीशी रिश्ता जुळणे, राज्यहिताच्या दृष्टीने फार महत्वाचे होते. आणि राज्यहित, ही त्याची प्राथमिकता होती. काही निर्णय होणे राज्याच्या दृष्टीने आत्यंतिक महत्वाचे होते. एक काटा मात्र त्याच्या हृदयात सलत राहिला. राजकुंवर अंतर राखून निघाले म्हटल्यावर बाकीचेही जरा दमानेच निघाले.

शर्यत जोशात चालली. इंचाइंचाने सामना रंगत चालला. कधी सुवर्णमतीचा घोडा पुढे, तर कधी चंद्रनागाचा. दोघेही शर्यतीत इतके रंगले की त्यांना जणू इतरांचा पूर्ण विसर पडला. सुवर्णमतीचे मागे बांधलेले केस एव्हाना पूर्ण मोकळे सुटले होते. भरधाव घोड्यावरून जाताना, ते पिसाऱ्याप्रमाणे तिच्यामागे उडत होते. तंग सुरवार आणि कातडी कोटातून तिचे सौष्ठव उठून दिसत होते. चंद्रनागाचे चित्त, विचलित होत होते, परंतु या शर्यतीतील जीत त्याला सुवर्णमतीपर्यंत विनासायास घेऊन जाणार हे त्यास पक्के माहित होते. तिच्या घोडसवारीतील कौशल्यास एकीकडे त्याचे मन दादही देत होते. भल्याभल्यांना त्यास शर्यतीत हरवणे बाजूला, इतकी उत्तम स्पर्धाही करता आली नव्हती.



सूर्यनाग लांबवरून स्तिमित होऊन त्या सौंदर्यवतीकडे पाहत होता. त्याच्याही नकळत त्याने घोड्याला टाच दिली. चंद्रनाग व सुवर्णमती वनमंदिरापर्यंत पोहोचणारच होते तेवढ्यात सुवर्णमती जोरात ओरडली "मंदिराच्या पहिल्या पायरीपर्यंत जो आधी जाईल तो जिंकला." दोघांनीही आपापल्या घोड्याचा वेग अधिकच वाढवला. अगदी जवळ जवळ दोन्ही घोडे वेगाने धावू लागले. मंदिराच्या पायऱ्या नजरेच्या टप्प्यात आल्या. आता अटीतटीचा सामना सुरू झाला. क्षणाक्षणाला घोडे एकाच वेगात पायऱ्यांकडे धावू लागले आणि काही कळण्यापूर्वीच सुवर्णमती घोड्यावरून खाली फेकली गेली. खाली पडताना तिने एक किंकाळी फोडली आणि ती निपचित पडली. काय झाले हे कळण्यापूर्वीच प्रतिक्षिप्त क्रियेने चंद्रनागाने घोड्याचा लगाम खेचला आणि एका उडीत तो सुवर्णमतीपर्यंत पोहोचला. तिची शुद्ध हरपलेली पाहून त्याने आसपास पाणी दिसते का पाहिले. सुदैवाने जवळच तळे दिसले. त्याने झटकन सुवर्णमतीस उचलून घेतले आणि तळ्याकाठी घेऊन आला. तिला खाली झोपवून पानाच्या द्रोणात पाणी घेऊन आला आणि तिचे मस्तक आपल्या मांडीवर घेऊन तिच्या चेहऱ्यावर पाणी शिंपडले. तसेच मोठी इजा नाही ना हे पाहिले. सुदैवाने सुवर्णमती जिथे फेकली गेली होती तिथे मुलायम वाळूचा ढिगारा होता. त्यामुळे फारशी इजा नव्हती. थंड पाण्याच्या स्पर्शाने सुवर्णमती शुद्धीवर आली. क्षणभर आपण कुठे आहोत याचा तिला विसर पडला आणि ती चंद्रनागाकडे पाहू लागली. चंद्रनागास सर्व जगाचा विसर पडला. आणि जेव्हा घोड्यावरून फेकले गेल्याची आठवण जागली तेव्हा ती प्रचंड घाबरली. हुंदक्यांनी तिचे शरीर गदगदू लागले. चंद्रनागाने तिला कवेत घेतले. तीही त्यास बिलगली.

सूर्यनाग तिथे पोहोचला तेव्हा त्यास ते दोघे असे पाहावयास मिळाले. एकमेकांच्या कवेत. अर्थात लगेच भानावर येत सुवर्णमती पट्कन उठली आणि काहीच न बोलता काहीशी लंगडत मंदिरात निघून गेली. चंद्रनागाने घडलेली सर्व घटना सूर्यनागास सांगितली. सूर्यनागाचा चेहरा दगडी झाला होता. ती दोघे एकमेकांच्या कवेत असलेले दृश्य तो विसरूच शकत नव्हता.

तेवढ्यात, राजे, राण्या, सेवक, सर्वच पोहोचले. घडलेली घटना ऐकून सर्वांचेच धाबे दणाणले. काहीही विपरित घडले नाही म्हणून सर्वांनीच देवाचे आभार मानले. सुवर्णमती मात्र एकदम गप्प गप्प होती. चंद्रनागाची आणि सूर्यनागाची नजर टाळत राहिली.

चारुलतादेवींना मात्र राहूनराहून एकाच गोष्टीचे आश्चर्य वाटत राहिले की घोड्याच्या पाठीवर पाय रोवून उभी राहून पतंग काटणारी आपली कन्या घोड्यावरून पडली कशी?





भाग ७

सर्व मंडळी महाली परतली. सेवक घोडे घेऊन येतील, आता सर्वांनी मोटरगाडीनेच जावे असा प्रस्तावबरहुकूम दोन्ही राजांनी ऐकवला तेव्हा कोणीच काही बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हते.

सायंकाळी दोन्ही राजे आणि सूर्यनाग यांची गुप्त बैठक झाली, ज्यात परकीय संकटावर चर्चा आणि त्यावर एकत्र राहून, एकजुटीने सामना करावा, त्यांच्याशी मैत्रीपूर्ण नाते ठेवून, आपल्या जनतेला कमीतकमी कसा त्रास होईल, यासाठी प्रयत्न करावा असे ठरले. सूर्यनागाने आराखडा सर्वांसमोर मांडला. दोन्ही देशांच्या सीमा, त्यांना जोडणारे इतर देश, त्यांच्यातील आपसीसंबंध, त्यांचे परकीयांशी संबंध, त्यांचे आपल्याशी संबंध, सगळ्याचा विचार सूर्यनागाने संपूर्ण मांडला त्या दोघांसमोर.

सुरजप्रतापसिंह अत्यंत प्रभावित होऊन, त्याचे मुद्दे ऐकत होते. अगदी असाच जामात हवा होता या राज्याला. हुशार, धोरणी, प्रजेचं हित जपणारा, कणखर, प्रसंगी लढाऊ वृत्ती दर्शवणारा. सुवर्णमतीच्या बुद्धीमत्तेला आव्हान देणारा. पण तिचा कल तर चंद्रनागाकडे दिसतो. ते विचारात पडले.

दुसऱ्या दिवशी मंडळी परतण्यास निघाली तेव्हा राणीसरकार अंत:पुरात जाऊन, सुवर्णमतीस भेटून, काही दिवस विश्रांती घेण्यास सांगून आल्या. बाकी कोणालाच ती भेटली नाही.

मंडळी परतली खरी, परंतु प्रत्येकजण मनात सुवर्णमतीस घेऊन आला. राजे आणि राणीसरकार तिला भावी सुनेच्या रुपात, चंद्रनाग तिला आपल्या कवेत, सूर्यनाग त्या दोघांना एकमेकांच्या कवेत. ते दृश्य काहीकेल्या त्यास मनावेगळे करता येईना. सैरभैर होऊन गेला तो. ‘उद्या जेव्हा ती खरेच चंद्रनागाची वधू बनून येईल तेव्हा काय करशील?’ त्याचे मन त्यास खिजवू लागले. अंगाची लाहीलाही होऊ लागली. राज्यकारभारात लक्ष लागेना. न्यायशास्त्राच्या चर्चा त्यास अत्यंत प्रिय, परंतु त्यातही मन रमेना.

एवढा राज्यकारभारात मुरलेला तरुण, पण प्रेमज्वराने हैराण झाला. स्वतःचाच संताप येऊन त्याने अधिकाधिक राज्यकारभाराच्या व्यापात स्वतःला बुडवून घेतले.

राजे शेषनाग यांनी, ही अपेक्षा केली नव्हती. प्रिय पुत्राची अवस्था त्यांना पाहवेना. आणि मनोमनी त्यांनी एक निर्णय घेतला. कुणालाही काहीही न सांगता राजदूत गंगानगरी धाडला.

राजदूताने खलिता खुद्द महाराजांच्या हातीच दिला. मजकूर वाचून, राजे मात्र चांगलेच विचारात पडले.

राजदूताची उत्तम सरबराई करण्यास सांगून आणि त्यास एक दिवस विश्रांती घेण्यास सांगून, ते तडक राणीसाहेबांच्या महाली आले. एव्हाना राजदूत आल्याची बातमी, अंत:पुरात पोहोचलीच होती. महाराजांनी एकांताचा हुकूम दिला. सेविका बाहेर गेल्या आणि त्यांनी मुख्य दरवाजा बंद केला. महाराजांनी जास्त वेळ न घालवता सरळ खलिताच वाचून दाखवला. दोघेही काळजीत पडले. ‘सुवर्णमतीस हे सांगावे कसे?’ तिच्या कौलाचा त्यांना अंदाज होता. राजाजींनी सरळ सरळ प्रस्ताव सूर्यनागाचा पाठविला होता. इकडे आड आणि तिकडे विहीर अशी अवस्था झाली होती. राजाजींना नाही म्हणणेही शक्य नव्हते आणि प्रिय कन्येला तिच्या मनाविरूद्ध विवाहास भाग पाडणे तर त्याहूनही शक्य नव्हते.

बराच वेळ दोघेही स्तब्ध बसले. मग राणीसरकार म्हणाल्या "प्रथम आपण सुवर्णमतीचे मत घेऊ. नंतर ठरवू पुढे काय निर्णय घ्यायचा ते".

सुवर्णमतीस बोलावणे न पाठवता, दोघेही स्वतःच तिच्या कक्षात पोहोचले. सुवर्णमतीस आश्चर्य वाटले. "पिताजी आपण का तसदी घेतली, मला बोलावणे नाही का पाठवायचे?"

दोघानाही काय बोलावे कळेना. "काही घडले आहे का?काही समस्या आहे का? आपण दोघे काही बोलत का नाही? सखी म्हणाली शेषनागरीहून राजदूत आला आहे, काय खबर आणली त्याने? "

राणीसरकारांनी मग सरळ विषयालाच हात घातला. तिच्यासाठी सूर्यनागाचा विवाह प्रस्ताव राजाजींनी धाडल्याचे स्पष्ट केले. दोघेही तिच्या प्रतिक्रियेची वाट पाहू लागले. खाली मान घालून ती स्वत:च्याच पायांची नखे निरखू लागली. दोघांना काय बोलावे कळेना.

शेवटी सुरजप्रतापसिंह उठले. लेकीकडे आले, तिच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले "बेटा, तुझ्यावर कसलेच बंधन नाही. तुझा विवाह तुझ्या इच्छेनुसारच होईल. मी राजाजींना नकार कळवतो.”

सुवर्णमतीने चमकून पिताजींच्या मुखाकडे पाहिले आणि म्हणाली "पिताजी, आपणास ते पसंत नाहीत का?" आणि नंतर मात्र लाजेने तिचे मुख अधिकच गुलाबी लाल झाले. आता आश्चर्यचकित होण्याची वेळ मातापित्यांची होती.

पुढे विषय न वाढवता सुरजप्रतापसिंह तडक आपल्या महाली आले. दिवाणजींबरोबर सल्ला मसलत करून नवा खलिता तयार केला. त्यात प्रस्तावाची स्वीकृती लिहीली आणि लवकरच पुढील गोष्टी ठरवण्यास आम्ही स्वत: आपल्याकडे येऊ असे कळवले. सगळ्या महाली पुनश्च उत्साह भरला.

इकडे राजदूत निरोप घेऊन पोहोचला आणि शेषनागांच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्यांनी ताबडतोब सर्व कुटुंबियांना पाचारण केले आणि हर्षभरल्या आवाजात सुवर्णमतीच्या पिताजींकडून सूर्यनागासाठी विवाहप्रस्ताव आल्याचे सांगितले. दोघेही पुत्र एकाच वेळी."परंतु पिताजी" एवढेच बोलून थबकले. त्यावर "सुरजप्रतापसिंह लेकीच्या मनाविरुद्ध कोणताच निर्णय घेणे शक्य नाही" या एका वाक्यात त्यांनी दोघांचेही बोलणे थांबवले. राणीसरकारांनाही जरा आश्चर्यच वाटले परंतु त्या मौन राहिल्या.

चंद्रनाग काहीच न बोलता आपल्या महाली आला. सूर्यनागही सर्वांचे अभिनंदन स्वीकारून आपल्या महाली आला खरा पण त्यालाही काही सुचेना. एक मन त्यास आनंदी होण्यास सांगत होते तर दुसरीकडे नजरेसमोर ती दोघे एकमेकांच्या कवेत सतत दिसू लागली. त्याची तडफड कित्येक पटीने वाढली. प्रेमज्वर, त्यातून संशयाने पीडित, पिंजऱ्यात बंदिस्त वाघासारख्या सूर्यनाग येरझाऱ्या घालू लागला.

'गंगानगरीस असताना संपूर्ण कल चंद्रनागाकडे दिसत होता राजकुंवारीचा, मग आता असे काय बदलले की माझ्यासाठी प्रस्ताव यावा? सुरजप्रतापसिंहांनी, पिताजींचा माझ्यावरचा विश्वास, पुढेमागे राजसिंहासनाचा वारस, या सर्व गोष्टी सांगितल्या असाव्यात का? राजसिंहासनाचा मोह भल्याभल्याना वाट्टेल ते करावयास भाग पाडतो.

पण एका दिवसात राजकुंवारीची चंद्रनागावरची प्रीत लगेच बदलली? एकनिष्ठा हा सर्वात मोठा गुण, तोच नसेल तर काय कामाचे ते स्वर्गीय सौंदर्य?

सरळ दूताकरवी नकार कळवून टाकावा. ही आग भावाभावात वितुष्ट आणेल. राज्यच्या राज्य स्त्रीमोहापायी जळून खाक झाल्याची उदाहरणे आहेत इतिहासात.





परंतु मी नकार दिला, तर पिताजी चंद्रनागास पुढे करतील. तो साधा सरळ कुंवर अलगद सापडेल तिच्या तावडीत. पिताजींना विश्वासात घेऊन सर्व सांगावे काय?

पण असे केल्यास पिताजी सरळ नकार कळवून मोकळे होतील. सुवर्णमती आपल्या राज्याची बहू नाही झाली तर शत्रूच्या राज्यात होईल तिचा रिश्ता. आणि मग राज्याची एक सीमा कायमची अधू होईल.

काय करावे? कसा सोडवावा हा पेच?

पण बरे झाले की तिथून माझ्यासाठी हा रिश्ता आला. चंद्रनागासाठी येता तर आपल्याला संशयही आला नसता. उगाच झुरत राहिलो असतो.

हम्म ! आता हे विष आपल्यालाच पचवावे लागणार. सर्व राज्याच्या, कुटुंबाच्या, चंद्रनागाच्या हिताच्या दृष्टीने हेच योग्य होईल. विषकन्या आहे ती.’

निर्णय झाला होता. प्रेमविव्हळ राजपुत्रावर धोरणी राज्यकर्त्याने मात केली होती. आता फक्त काळजी होती चंद्रनागाची. त्याला जपावे लागणार होते.

पण सर्वप्रथम पिताजींशी सल्लामसलत करून स्वीकृतीचा खलिता पाठवयाला हवा. सूर्यनाग पिताजींच्या महाली दाखल झाले.

उतावळ्या स्वभावाच्या चंद्रनागास विचार करत बसणे शक्यच नव्हते. तो तडक गंगानगरी जाण्यास निघाला. अर्थात कोणालाही कसलीच कल्पना न देता.

मोटरगाडी गंगानगरीजवळील एका खेड्यात ठेवून तिथून घोडा घेऊन, वेषांतर करून तो गंगानगरीस पोहोचला. या वेळेस तो अर्थातच राजमहाली जाणार नव्हता. तिथल्याच एका मुसाफिरखान्यात त्याने स्वत:साठी राहण्याची सोय पाहिली. मुसाफिरखान्यात मुद्दामच 'आपण हिऱ्यामोत्यांच्या दागिन्यांचा व्यापारी असून काही खास विलायती दागीने आपल्याजवळ आहेत. इथल्या राजकुमारीस ते आवडतील आणि आपल्यास चांगली किम्मत मिळेल या आशेने आपण आलो असल्याचे त्याने सर्वांना सांगितले.'

माझी मुलगी राजकुमारीच्या सखीची सखी असून ती तुझी काही मदत करू शकेल असे मालकाने म्हणताच चंद्रनागास अत्यानंद झाला.

मालकाच्या मुलीने त्या सखीस दुसरेच दिवशी बोलावून घेतले. तिची भेट या व्यापाऱ्याशी घालून दिली. चंद्रनागाने साठीच्या आसपास वय दिसावे असे वेशांतर केल्याने सखीस





कोणतीच शंका आली नाही. तिने दागीने पाहण्यास मागताच, "ते मी फक्त राजकुंवारीसच दाखवीन" असे त्याने स्पष्ट सांगितले. "राजकुंवारीस ते आवडले नाहीत तर माझ्यावर बेतेल" असे सखीने म्हणताच "त्यांना ते आवडले नाहीत तर खुशाल म्हणाल ती शिक्षा भोगेन" असे त्याने ठणकावून सांगितले. यावर मात्र ती सखी काही न बोलता "बघते कसं करायचं ते" असं म्हणून गेली. आता वाट पाहण्याशिवाय चंद्रनाग काहीच करू शकत नव्हता. त्याला सुवर्णमतीस भेटण्याची उत्कट इच्छा होती परंतु घाई करण्यात अर्थ नव्हता.

सुवर्णमतीही वाट पहात होती. तिच्या खास हेराने चंद्रनाग वेशांतर करून गंगानगरी पोहोचल्याची बातमी तिला दिली होती आणि चंद्रनागाकडून पुढची हालचाल होण्याची ती वाट पाहत होती. तिने नियतीचेही आभार मानले. नियतीने राजाजींना सूर्यनागाचा प्रस्ताव तिच्यासाठी पाठवण्याची बुद्धी देऊन तिची योजना मार्गी लावण्यात मोठाच हातभार लावला होता.

अपेक्षेप्रमाणे हालचाली घडू लागल्या. सखी व्यापाऱ्याची वार्ता घेऊन आली. तिने त्यास महाली लगेच न बोलावता आपण कळवू तेव्हा यावे, सध्या जरा व्यस्त असल्याचा निरोप सखीसोबत पाठवला. सखीने व्यापाऱ्यास निरोप दिल्यावर तो अत्यंत बेचैन झालेला दिसला. मग "आपण फार लांबून आलो आहोत आणि स्वगृही परत जाण्याचे वेध लागले आहेत. कृपा करून राजकुंवारीची लवकरात लवकर भेट घडवून आणावी" अशी याचना सखीजवळ करू लागला.

सखीने दुसऱ्या दिवशी परत सुवर्णमतीकडे त्याचा विषय काढला. 'तो कसा वयस्क असून प्रवासाने शिणला आहे, आपल्या भेटीने त्याचे कसे भले होईल' वगैरे करूण वर्णन ती करू लागली तेव्हा मात्र सुवर्णमतीस हसू आवरणे कठीण झाले.

मग ती म्हणाली "आमची व्यस्तता तुला दिसतेच आहे. घोड्यावरून पडल्यापासून आमचे चित्त ठिकाणावर नाही. उद्या परत आम्ही वनमंदिरी जाऊन परमेश्वराच्या सान्निध्यात एकांतात काही घटिका ध्यानस्थ बसावे म्हणतो. तू सायंप्रहरी त्या व्यापाऱ्यास घेऊन ये. परंतु त्यास बजावून सांग की सकाळच्या प्रहरात त्याने अजिबात येण्याची घाई करू नये. आम्ही एकांतात परमेश्वराच्या समीप काही घटका घालवू इच्छितो."

सखीने सारा वृतांत चंद्रनागास येऊन सांगितला. आपण कसे त्याच्यासाठी शब्द टाकला आणि कसे मन विचलित असूनही केवळ आपल्या शब्दाखातर राजकुंवारी भेटीस तयार झाली





आणि सकाळचे काही प्रहर ती वनमंदिरी जाऊन एकांतात घालवू इच्छिते वगैरे सर्व वृतांत . सायंप्रहरी व्यापारासाठी तयार राहण्यास बजावून सखी गेली.

आता चंद्रनागाच्या जीवात जीव आला. तो भल्या पहाटेसच उठला आणि घोडसवार होऊन वनमंदिर परिसरी जाऊन पोहोचला. मग त्याने आपले सर्व वेशांतर उतरवले. आपल्या पूर्वस्वरूपात येऊन त्याने आत जंगलाकडे कूच केले. राजकुंवारी कितीही म्हणाली, एकांत वगैरे, तरी तिच्यासोबत एखादी सखी आणि काही सैनिक हे असणारच. तत्पूर्वी घोड्यास लपवणे आवश्यक होते. घनदाट जंगलात शिरून त्याने एक भरपूर उंच वृक्ष शोधला. त्यास खुणेची दोरी बांधून तो आणखी थोडा आत गर्द झाडीत शिरला. हातातील कोयत्याने झुडपे छाटत मोकळी जागा बनवून घोड्यास तिथे सैलसर बांधले आणि परत मागे येऊन त्या उंच वृक्षाच्या शेंड्यावर चढून बसला. इथून सुवर्णमतीच्या येण्याचा रस्ता स्पष्ट दिसत होता.

तिला भेटण्याची उत्कंठा आता शिगेला पोहोचली होती. त्याला धीर धरवत नव्हता. आधीच उतावळा स्वभाव, त्यात प्रेमबाधा झालेली. आपण काय बोलणार, त्यावर ती काय म्हणेल, याची वारंवार उजळणी मनातल्या मनात होत होती. आपलं चुकलंच जरा. मागच्या वेळेस परत जाण्यापूर्वीच तिची भेट घेऊन आपली प्रेमभावना स्पष्ट बोलून दाखवली असती तर एवढं रामायण घडलंच नसतं असं वारंवार त्यास वाटत राहिलं.

काही घटका अशाच गेल्या ज्या त्यास युगांप्रमाणे भासल्या.

अचानक लांबवरून एक ठिपका जवळ येताना दिसू लागला. घाई करण्यात अर्थ नव्हता. सैनिक पुढे टेहळणीसाठी आला असावा. हळूहळू घोडेस्वाराची आकृती जवळ जवळ येऊ लागली. जिथे सुवर्णमती पडली होती तिथे येऊन ती थांबली. घोडेस्वार पायउतार झाला. त्याने घोड्यास थोपटून लगाम सोडून दिला. डोक्याचा फेटा सोडला आणि सुवर्णमतीचे लांबसडक केस पाठीवरून खाली रुळू लागले.

चंद्रनाग अनिमिष नेत्रांनी पहात राहिला.

सुवर्णमती तलावाकाठी आली आणि पाण्याकडे पाहत बसून राहिली. बराच वेळ झाला तरी दुसरं कोणीच आलं नाही तेव्हा चंद्रनाग झाडावरून खाली उतरला. झरझर जंगल पार करून मागील बाजूने सुवर्णमतीच्या दिशेने आला आणि सावकाश ती दचकणार नाही अशा पद्धतीने तिच्यापासून काही अंतरावर तिच्यासमोर येऊन उभा राहिला. दोघांची नजरानजर





झाली आणि सुवर्णमती आसपास नजर टाकत झट्कन उठून उभी राहिली. "राजकुंवर, आपण? आणि एकटेच? इथे कसे? काहीच खबर नाही आपल्या येण्याची".

आपल्या येण्याने सुवर्णमती पुरती गांगरून गेली आहे हे चंद्रनागास स्पष्ट दिसत होते. मग त्यानेच बोलावयास सुरूवात केली.

"राजकुंवारी, मागच्या वेळेस आपण जेव्हा भेटलो, तेव्हा आपणा दोघात काही सुंदर बंध निर्माण होत आहेत असे आम्हास जाणवत होते, मग आपण या स्थळी आलो व ते बंध अधिक दृढ झाले, निदान आम्ही तरी तसेच समजत होतो. परंतु नंतर आपल्या पिताजींनी आपला विवाहप्रस्ताव सूर्यनागांसाठी पाठवला आणि सगळाच संभ्रम निर्माण झाला. सरळ आपल्याशी बोलून हा तिढा सोडवावा म्हणून आम्ही तडक इथे निघून आलो."

सुवर्णमतीच्या मनात प्रचंड गोंधळ माजल्याचे तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. ती आर्तपणे म्हणाली "आपल्या बंधूंचा प्रस्ताव आपल्याच पिताजींनी पाठवला. शेषनगरीचा प्रस्ताव फेटाळण्याचे साहस गंगानगरीत नाही आणि तसे करावे तरी कशासाठी? आपल्या बंधूंविषयी माझे मनात अपरंपार आदर आहे. आणि जीवनसंगिनी होण्यास माझ्या दृष्टीने हे पुरेसे आहे."

चंद्रनाग आश्चर्याने पाहतच राहिला. झटक्यात पुढे होत म्हणाला, "सुवर्णे काहीतरी मोठाच घोटाळा आहे हा. राजाजी म्हणतात प्रस्ताव तुझ्या वडिलांकडून आला, तू म्हणतेस राजाजींनी पाठवला, खरे काय ते शोधून काढलेच पाहिजे प्रिये!" असे म्हणत सुवर्णमतीचा हात हाती घेण्यास चंद्रनाग पुढे सरसावला.

तत्क्षणी राजकुंवारी दोन पावले मागे सरकली. "थांबा कुंवर, आपण काय बोलता आहात? कोणास खरे कोणास खोटे ठरवणार आहोत आपण? आपल्या स्वतःच्या पिताजींना? विवाहप्रस्तावाच्या स्विकाराची वार्ता एव्हाना सर्वत्र पसरली असेल. आता, ही गंगानगरी आणि शेषनगरीच्या इभ्रतीची बाब आहे. जेव्हा आपण राजघराण्यात जन्म घेतो तेव्हा आपल्यावर सर्वप्रथम अधिकार आपल्या राज्याचा असतो, मग आपल्या मातापित्यांचा आणि नंतर आपला स्वतःचा. आता हा प्रस्ताव मोडणे कदापि शक्य नाही. तो विचारही मनातून काढून टाका."

काय करावे हे त्यास सुचेना. आयुष्यात प्रथमच त्याला इतके असहाय्य वाटत होते. सुवर्णमती जे बोलत होती त्यातील शब्द न् शब्द बरोबर होता. आता हा प्रस्ताव मोडणे आणि चंद्रनागाबरोबरचा प्रस्ताव पाठवणे हे दोन्ही राज्यांच्या नाचक्कीचे मोठेच कारण ठरते. वर सुवर्णमतीच्या चारित्र्याविषयी उलट सुलट चर्चेस उधाण आले असते ते वेगळेच. भावनांचा प्रचंड कोलाहल माजला त्याच्या मनात. पराजीत भावनेने तो एकदम खाली बसला. सुवर्णमती

त्यास म्हणाली, “कुंवर आता आपण आपल्या राज्यास परतावे हे बरे. आपण सर्वतोपरी कोणत्याही राजकन्येच्या स्वप्नीचे राजकुंवर होण्यास लायक आहात. आपण बोट दाखवाल ती राजकन्या आपल्या मागून येण्यास तयार होईल." असे म्हणताच राजकुंवरने सुवर्णमतीकडे बोट दाखवले. सुवर्णमती खिन्न हसली. हळूहळू चालत घोड्याकडे गेली आणि पाहतापाहता घोड्यावर बसून दिसेनाशी झाली. राजकुंवर त्याच रात्री शेषनगरी परतले.





भाग ८

शेषनगरीतून गेलेला चंद्रनाग आणि गंगानगरीतून परतलेला चंद्रनाग या दोन भिन्न व्यक्ती होत्या असेच म्हणावे लागेल. सळसळत्या उत्साहाच्या धबधब्याला अचानक बांध लागल्यासारखे झाले. तो फारसे कोणाशी बोलेना. आपल्यातच मग्न राहू लागला. मनोमनी सुवर्णमतीसाठी झुरू लागला.

तो महालातून नाहीसा झाल्यावर सूर्यनागाने गुप्त हेर त्याला शोधण्यासाठी पाठवले होते. त्यांनी चंद्रनाग गंगानगरी जाऊन राजकुंवारीस भेटला आणि भेट संपताच तडक शेषनगरीस परतला असा वृत्तांत दिला. ही भेट काही पळांचीच होती असेही त्यास कळले. सूर्यनागास चंद्रनागाचे झुरणे पाहवेना. त्याने चंद्रनागाशी बोलण्याचा प्रयत्न केला. अर्थात तोही निष्फळ ठरला कारण, आता परिस्थितीत कोणताही बदल घडू शकत नाही हे चंद्रनागाच्या मनाने पक्के ठरवले होते. किंबहुना सुवर्णमतीने ते त्याच्या मनावर बिंबवले होते.

दिवस हळूहळू पुढे जात होते. राजे सुरजप्रतापसिंह यांनी सपत्निक येऊन विवाहविषयीचे पुढचे निर्णय घेण्याविषयी इच्छा व्यक्त करणारा खलिता पाठवला. शेषनागांनी त्याविषयी सर्वांना सांगितले. त्यांच्या आगमनाची तयारी चोख करण्याची जबाबदारी चंद्रनागाने उचलावी असा प्रस्ताव पुढे ठेवला तेव्हा चंद्रनागाने पुढील शिक्षणासाठी विलायतेत परत जाण्याचा विचार बोलून दाखवला. त्यावर राजाजींनी विवाहविधी संपन्न झाल्यावर जावे असे सूचित केले. या प्रस्तावास नाही म्हणणे कुंवरास शक्य झाले नाही.

ठरल्याप्रमाणे सुरजप्रतापसिंह आणि चारुलतादेवी बाकी लवाजम्यासह शेषनगरी येऊन, विवाहाविषयी सर्व बोलणी करून, लगेचचाच मुहूर्त पक्का करून परतले. बारात सात दिवस गंगानगरी राहील, सर्व सोपस्कार, विधी पार पाडून सातव्या दिवशी गोरज मुहूर्ती फेरे होतील, आणि बारात नववधूसह शेषनगरी परतेल अशी योजना ठरली. परकीय पाहुण्यांना या समारंभात आमंत्रित न करता त्यांच्यासाठी नंतर शेषनगरी मेजवानीचा बेत करावा असे ठरले. याच वेळी दोन्ही राज्यांचे दिवाणजी या विवाहानिमित्त दोन्ही राज्यांमधे कोणकोणत्या प्रकारची देवाण घेवाण होणार, सीमा कशा जोडल्या जाणार, आपसात कसे व्यापारी, आर्थिक आणि सेनेचे करार होणार याविषयी खलबते करत होते.





चंद्रनाग केवळ पिताजींनी सोपविलेल्या कामगिरीस योग्यप्रकारे निभावण्याच्या हेतूने सहभागी होत होता. सुवर्णमती मातापित्यांबरोबर न आल्याने चंद्रनाग एकीकडे मनातून खट्टू झाले तर एकीकडे काहीसे सुटल्यासारखेही झाले. ती आसपास असताना कामात लक्ष घालणे फारच कठीण झाले असते. सूर्यनागासही तिचे न येणे हुरहूर लावून गेलेच. ती येती तर आपल्याला तिचा हेतू अधिक जोखता आला असता असे त्यास वाटले.

इकडे सुवर्णमती नव्याने आलेल्या खास इथल्या संस्थानिकांसाठी बनवलेल्या कायद्याविषयी, वाचत बसली होती. 'आपल्या विवाहामुळे या आपल्या राज्यावर काही आपत्ती तर येणार नाही ना? परकीयांच्या आजपावेतो फारसे डोळ्यांत न खुपलेले आपले राज्य, न जाणो मोठ्या राजघराण्याशी संबंध आल्याने सर्वांच्या नजरा आपल्या राज्यावर रोखल्या गेल्या तर? तसे झालेच तर काय करावे म्हणजे विनासंघर्ष यातून मार्ग निघेल?' तिला नकळत सूर्यनाग आठवले. 'याविषयी त्यांच्याशी एकदा बोलायला हवे. त्यांना स्त्रियांनी राज्यकारभारात लक्ष घातलेले आवडेल? आपण जेव्हा त्यांच्याशी या विषयावर बोलावयाची इच्छा प्रकट केली तेव्हा त्यांना अतिशय आश्चर्य वाटल्याचे दिसले परंतु त्यात नाराजी नव्हती. उलट एक प्रकारचे कुतुहल होते त्यांच्या नजरेत. आता दिवाणजींबरोबर काय निरोप येतो ते पाहू. या राज्याने व त्यांच्या राजकुंवरने याआधीही आपल्याला संकटातून वाचवलेच आहे. हे नाते जुळले तर अधिक सुरक्षित होईल आपले राज्य.'

'चंद्रनागास मात्र यात काहीच रस नसावा.' चंद्रनागाचा विचार मनात येताच सुवर्णमतीस काहीसे अपराधी वाटले. परंतु तसे वागणे तिच्या योजनेस पुढे नेण्यासाठी किती गरजेचे होते या विचाराने तिने मनातील अपराधी भावनेस मुळापासून उपटून टाकले.

शेषनगरीतून कन्येकडील लवाजमा बाहेर पडताक्षणीच सूर्यनागने दिवाणजींना बोलावून घेतले आणि दिवाणजी दोन्हीकडच्या करारातील बारीक सारीक तपशील कुवरांस आणि राजाजींना सांगू लागले.

एका मुद्यावर बोलता बोलता दिवाणजी अडखळले तेव्हा कुंवर चमकून त्यांच्याकडे पाहू लागले. महत्वाच्या बोलण्यात अडखळण्याची त्यांना सवय नव्हती. "माफी असावी कुंवर पण काही मुद्दे असे आहेत की......"





“दिवाणजी जे असेल ते सांगावे.”

"गंगानगरीच्या राज्यावर वरवर पाहता, कागदोपत्री राजा म्हणून आपले राज्य असेल, तसा तुमचा राज्याभिषेकही होईल, परंतु निर्णयाचे सर्व हक्क राजकुंवारी आणि आपण, राजाजी आणि राजे सुरजप्रताप यांच्या कडे विभागून राहतील. प्रामुख्याने प्रजेच्या हितसंबंधांच्या निर्णयाचे सर्व हक्क! तसेच शेषनगरीतील राज्यकारभारात सुवर्णमतीस एका मताचा अधिकार असावा.”

सूर्यनागचे डोळे नकळत बारीक झाले. भुवयांच्या मधे एक बारीक आठी उमटली.

"हे राजांनी ठरविलेले मुद्दे आहेत?"

दिवाणजींनी पुन्हा एकदा घसा खाकरला. "नाही कुंवरजी, हे राजकुवारींनी स्वत: जातीने दिवाणजींबरोबर बसून ठरवलेले मुद्दे आहेत."

सूर्यनाग हसले. त्यांचे कुंवारीविषयीचे अंदाज बरोबरच होते.

"दोन्ही मुद्द्यांना मान्यता द्या दिवाणजी." दिवाणजींनी एकदा राजाजींकडे पाहिले. त्यांनीही मान डोलावली तसे पुढे काही बोलण्यास उरलेच नाही.

विवाह, तोही राजकन्येचा. गंगानगरी उजळून निघाली. मान्यवरांना आमंत्रणे, आहेर पोहोचवले गेले. तसेच सर्व जनतेला राजांनी हत्तीवरून साखर वाटत, विवाहाचे भोजनाचे आमंत्रण दिले. “प्रजेचे भोजन फेऱ्यांच्या एक दिवस आधी होईल, आणि स्वत: राजकुंवारी आणि जमाई राजे जातीने हजर राहतील याची नोंद घ्यावी होsss ! सर्व जनतेने भोजनाचा आस्वाद घेण्यास आणि राज्याच्या कन्येस आशिर्वाद देऊन विदा करण्यास हजर रहावे होssss!” दवंडी पिटत हुजऱ्या चौकाचौकात जात होता.

विवाहासाठी जय्यत तयारी सुरू झाली. कुंवारीचे जेवर, कपडे, तिच्याबरोबर सासरी पाठवण्याचे पेटारे, कशाकशात काही कमी राहू नये यासाठी मातापित्याची गडबड सुरू होती. जागोजागी मांडव घालण्यात आले. सर्व बगिच्यांना सुशोभित करून कारंजी उडू लागली. महालात तर रोषणाईच करण्यात आली. गंगानगरीच्या प्रजेने नव्या राजाच्या स्वागताप्रित्यर्थ घरोघरी गुढ्या तोरणे उभारली. रस्ते रांगोळ्यांनी सुशोभित झाले.





विवाहाचे सात दिवसही प्रजेस, घरी अन्नच शिजवू नये, असे सांगण्यात आले. ठिकठिकाणी मिष्टान्नाचे लंगर, भोजन पुरवत राहिले. प्रजा विवाहाचा आनंद लुटत राहिली. पारंपारिक पद्धतीने हळदीचा कार्यक्रम झाला. आधीच सौंदर्यखणी, त्यातून नववधू, सुवर्णमतीच्या सौंदर्याने दोन्हीकडचे पाहुणे दिपून गेले. चंद्रनाग आतल्याआत जळत राहिला.

फेऱ्यांच्या आदल्या रात्री प्रजेसाठी खास भोजनसमारंभ होता. प्रथम राजकुंवारीकडून प्रत्येकास काही सुवर्णमुद्रा देण्यात आल्या. त्याचे वाटप दिवाणजी स्वत: जातीने करत होते. नंतर राजकुंवारी स्वत: येऊन सर्वांना अभिवादन करून म्हणाली, "प्रत्येक कन्येचे विवाह करून सासरी जाण्याचे स्वप्न असते, परंतु ती वेळ आली की तिचा पाय अडतो. मातपित्यास सोडून जाणे जीवावर येते. मी तर राज्याची कन्या. आपण सर्वच माझे मातापिता. सर्वांना सोडून जाणे मला किती जड जात असेल हे तुम्ही सर्व जाणताच. आपला आशीर्वाद सतत माझ्या पाठीशी असेल आणि त्याच्या बळावर मी ससुराल आणि मायका दोन्हीस जोडून ठेवू शकेन असे मला वाटते." नकळत सुवर्णमतीचे डोळे पाणावले. स्वर हळवा झाला आणि या क्षणी मात्र त्यात अभिनयाचा लवलेशही नव्हता!

प्रजेचे डोळेही पाणावले. उस्फुर्त पणे राजकुंवारीचा जयजयकार सुरू झाला आणि मग भोजन परोसण्यास सुरूवात झाली.

राजकुंवारीच्या प्रस्थानानंतर कुंवर सूर्यनागही येऊन प्रजेस त्यांच्या कन्येची आणि या राज्याचीही यथायोग्य काळजी घेण्याचे वचन देऊन गेले. “तुम्ही आपली कन्या मला दिलीत, मी आपले तन, मन, धन, आपल्या साठी खर्ची घालेन. दोन्ही राज्ये एकत्र आली तर अधिक बळकट होतील. एकजुटीने आपण आपली राज्ये अधिक सुरक्षित करू.”

दुसऱ्या दिवशी वधू फेऱ्यांसाठी सजून आली आणि घुंगटही दुल्हनच्या सौंदर्यावर गर्व करता झाला. जोतो, दुल्हा किती नशीबवान आहे, याचीच चर्चा करत होता आणि ही चर्चा पुढे बरेच दिवस सुरू रहाणार यात काहीच शंका नव्हती.

फेरे झाले आणि बिदाईचा समय आला. राजे सुरजप्रतापसिंह आणि चारुलतादेवींचे डोळे भरून आले. सुवर्णमतीच्या सख्या, सेवकसेविका रडू लागले. सुवर्णमतीने मात्र निग्रहाने अश्रू अडवले. तांदुळाच्या साळ्या डोक्यावरून आईच्या पदरी घालून, मागे वळून न पाहता शेषनगरीची बहू डोलीत जाऊन बसली. डोली उठली तसा पिता अश्रूभरल्या डोळ्यांनी





डोलीबरोबर चालू लागला. त्याच्या पाठोपाठ सर्व प्रजाही आपल्या लाडक्या राजकन्येस विदा करण्यास वेशीपर्यंत चालत आली. सर्वांच्याच डोळ्यात अश्रू मावत नव्हते.

डोली वेशीबाहेर पडल्यावर मंडळी परतली. पुढचा प्रवास मोटरगाडीने झाला.

प्रथम निघाल्या सैन्याच्या मोठ्या गाड्यांचा ताफा, मधे सेनापती, राजे आणि राणीसरकार, त्यामागे सूर्यनाग आणि सुवर्णमती, चंद्रनागाने त्यांच्या गाडीचे सारथ्य करण्याचे ठरवले. मागे शंखनाग आणि सैमित्रेची गाडी, आणि त्यानंतर इतर काही नातेवाईक, खास दरबारी, यांची गाडी, आणि सर्वात शेवटी परत सैनिकांची मोठी गाडी. मोटरगाड्या निघाल्या आणि सुवर्णमतीचा इतका वेळ कसाबसा अडवून ठेवलेला बांध कोसळला. मोठे मोठे अश्रू गालांवर ओघळू लागले. पालथ्या, मेंदीने रंगवलेल्या हाताने, ती ते पुसू लागली. सुरमा, काजळ, गालांवर ओघळू लागले. दुसऱ्या कोपऱ्यात बसलेल्या आणि स्वतःच्याच विचारात पूर्णपणे गुरफटलेल्या सूर्यनागाच्या लक्षात ही गोष्ट येण्यापूर्वीच, समोरच्या आईन्यात चंद्रनागास हे दिसले आणि त्याने चट्कन गळ्यातील शेला काढून तिच्या पुढे धरला. तिने शेल्याचा स्वीकार केला. इतका वेळ बेखबर असलेल्या सूर्यनागाने, नेमके हे पाहिले आणि त्याच्या कानशिलावरची नस तडतडू लागली. पुढचा चार एक तासाचा प्रवास निःशब्द पार पडला. या विषकन्येपासून चंद्रनागास कसे वाचवावे हा एकच विचार प्रवासभर सूर्यनागास वेढून राहिला.

सुवर्णमती थोडीशी सावरल्यावर तिने डोळ्यांच्या कोपऱ्यातून सूर्यनागाकडे पाहिले. पण तो संपूर्णपणे स्वविचारात गुरफटलेला तिला दिसला.





भाग ९

शेषनगरीही नव्या बहूच्या स्वागतासाठी सजली होती. गुढ्या, तोरणे, कारंजी आणि खास शेषनगरीचे वैशिष्ट्य असलेल्या मोठमोठ्या गालिचांच्या रांगोळ्या. इथली भव्यता निराळीच होती. ‘आपल्या महालास लाजवतील, अशा भव्य, इथल्या दरबाऱ्यांच्या कोठ्याच आहेत.’ सुवर्णमतीच्या मनी आले.

राजमहाल दुरूनच दिसू लागला. रात्रीच्या काळोखात त्यावर केलेली रोषणाई पाहून डोळे दिपून जात होते.

रस्त्याच्या दोन्ही बाजूस उभे राहून, नगरवासी जयजयकारात नव्या बहूचे स्वागत करत होते. सगळीकडे जल्लोष सुरू होता.

महालात पोहोचताच नव्या बहूस प्रथेप्रमाणे कुंकुमजलात पाऊले बुडवून आत येण्यास राणीसरकारांनी सुचवले. तसेच तळहात कुंकुमजलात बुडवून तिच्यासाठी राखून ठेवलेल्या भिंतीवरील कोनाड्यात उमटवण्यात आले. आता एकच कोनाडा रिता उरला, चंद्रनागाच्या बहूचा!

नंतर थोडेसे जलपान झाले आणि दुल्हादुल्हनला त्यांच्या कक्षापर्यंत मोठ्या जेठ, जेठाणींनी रीतीप्रमाणे पोहचवावे असे सांगण्यात आले. जेठ, जेठाणी हसत हसत उठले. जेठजींनी सूर्यनागाचा हात धरून ठेवला. जेठाणी सौमित्रा सुवर्णमतीस घेऊन कक्षात गेली. तिला जेठाणीने खास मऊसूत मखमली वस्त्रे लेवविली. नाजूक आभूषणे दिली. मग खाण्यापिण्याची सर्व व्यवस्था आहे की नाही हे पाहून, तिने श्रृंगारलेल्या पलंगावर तिला बसवले. मग मोठा घूँघट तिच्या चेहऱ्यावरून ओढून घेतला. आज घूँघट उठलाच पाहिजे, नाहीतर अपशकून होतो असे हसतहसत सांगून बाहेर पडली.

सौमित्रा खाली आल्यावर, शंखनागाने सूर्यनागास हातास धरून वर नेले आणि त्याच्या कक्षात नेऊन सोडले. बाहेरून दार बंद करून तो हसतहसत निघून गेला.

सूर्यनाग सजवलेल्या पलंगाजवळ आला. काही क्षण तेथेच उभा राहिला आणि पाठ वळवून निघून जाऊ लागला. सुवर्णमतीच्या तोंडून आश्चर्याने उद्गार निघाले, "कुंवरजी?"

तो जागीच थांबला. तिच्याकडे पाठ करून. काहीच बोलला नाही. काही क्षण असेच अवघडलेल्या शांततेत गेले.

मग सुवर्णमती अडखळत म्हणाली, "जेठाणीजी सांगून गेल्या, घूँघट आज नाही उठला तर अपशकून होतो."

सूर्यनाग सावकाश मागे वळला. तिच्याजवळ आला. घूँघट झट्क्याने चेहऱ्यावरून ओढून मागे टाकला. सुवर्णमतीने नजर उचलून पाहिले. सूर्यनागाची नजर तिच्यावर खिळली होती. प्रचंड विखारी तिरस्कार त्या नजरेत भरला होता. सुवर्णमती पार अंतर्बाह्य हादरून गेली. काही बोलण्यासाठी तिचे ओठ हलले पण शब्द बाहेर पडलेच नाहीत. काही क्षणात एक अत्यंत विषारी हास्य, तिच्या चेहऱ्यावर फेकून, सावकाश वळून, सूर्यनाग कक्षालाच लागून असलेल्या, दुसऱ्या दालनात निघून गेला आणि त्याने दार लावून घेतले.

एखादी विखारी, तिरस्कारपूर्ण नजर काही वेळेस मोठ्यातल्यामोठ्या आघातापेक्षाही बरीच पडझड करून जाते. जेव्हा हे अनपेक्षितपणे घडते, तेव्हा तर, हा आघात फारच भयंकर असतो. सुवर्णमतीला हा धक्का एवढा मोठा होता की, काही काळ तिला समजलेच नाही की नक्की काय घडले. आश्चर्य, अपमान, अवहेलना, दु:ख, पराभव, या सर्व भावनांच्या कल्लोळात, ती किती तरी वेळ तशीच बसून राहिली. हळूहळू अश्रू गालांवर ओघळू लागले.

बराच वेळ असाच गेल्यावर, मग सावकाश उठली. आतल्या बाजूला जलकुंड होते. सावकाश वस्त्रे उतरवून ती जलकुंडात शिरली. तिच्या मनीची आग आता ते जलकुंड तरी कसे विझवणार?

मग तिच्या मनात विचारचक्र सुरू झाले. चूक आपलीच आहे. आपण इतर सर्व गोष्टींची परिपूर्ण योजना आखत गेलो. या नातेसंबंधाविषयी पण विचार जरूरीचा होता. जो आपण कधी केलाच नाही. विवाहविधी म्हणजे विवाह नव्हे, हे आपणास कसे उमगले नाही? आपल्या मनी त्यांच्याविषयी प्रीत आहे, म्हणजे त्यांच्याही मनी असेलच, असे आपण गृहीत धरले. एवढा माझ्याबद्दल तिरस्कार कुवरांच्या मनात का आणि कधी निर्माण झाला असेल? आणि आपल्या ते लक्षातही येऊ नये? एवढ्या कशा गाफिल राहिलो आपण? तिला त्या दिवशीची, गंगानगरीतील रात्रीची, कुवरांची आणि तिची भेट आठवली. किती आस्थेने बोलले ते आपल्याशी. नंतर मात्र विवाहाच्या विधींशिवाय तशी आपली भेटच नाही झाली. मग मधल्या काळात असे काय घडले असावे?





सुवर्णमतीची मती चालेनाशी झाली. बऱ्याच वेळाने ती पाण्यातून बाहेर आली, वस्त्रे परिधान करून पलंगावर येऊन बसली. आता पुढे काय हा प्रश्न तिच्या मनात घोंघावू लागला. बराच काळ ती या प्रश्नाशी झुंजत होती.

मग तिने जाणीवपूर्वक स्वत: आणि कुंवर यांना मनावेगळे केले. तिची, ही जूनी सवय. एखादी गोष्ट फारच मनात घोंघावू लागली आणि त्यातून पुढचा मार्ग दिसत नसेल, तेव्हा त्या मुद्द्याला पूर्ण मनावेगळे करावे, इतर गोष्टींवर लक्ष केंद्रित करून त्यांचे प्रश्न मार्गी लावावेत, नवे आराखडे बनवावेत. काही काळाने पुन्हा नव्याने जुन्या प्रश्नांना तपासून पहावे. बऱ्याचदा त्याचे उत्तर आसपासच सापडे.

तिरस्कार वाटूनही, कुंवर लग्नवेदीवर उभे राहिले होते याचाच अर्थ राज्यहित त्यांच्याही मनी प्रथमस्थानी होते. आणि या एकाच गोष्टीवर तिने लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले. एकदा निर्णय झाल्यावर ती शांतपणे झोपून गेली.

सूर्यनागाने मात्र रात्र तळमळत काढली. एकीकडे सुवर्णमतीला दिलेला हा कडवा आघात त्यांस सुखावत होता तर दुसरीकडे त्यावेळची तिची दु:खाश्चर्याने स्तिमित नजर आठवून, प्रथमच तो स्वत:च्या विचारांबाबत साशंक झाला होता. 'सुवर्णमती आम्हा दोघांना खेळवण्याच्या दृष्टीने, आणि राज्यमोहाने इथे माझ्याशी विवाह करून आली असेल तर आज तिच्या डोळ्यात दु:ख का दिसावे? राग, संताप, उद्रेक का नव्हता? ते नाटक असेल, तर, ही एक महान अभिनेत्रीच असली पाहिजे.'

त्यांच्या सुहागरात्रीच्या कल्पनेने चंद्रनागानेही रात्र तळमळत काढली.





# भाग १०

सकाळी दरवाजावर टकटक झाली आणि सुवर्णमती दचकून उठली. भरभर दरवाजाजवळ जात कोण आहे याचा कानोसा घेतला. बाहेर तिची सेविका आली होती.

‘राणीसरकारांनी चुल्हापूजनासाठी स्नान आटोपून बोलावले आहे, दरवाजा उघडावा’ असे तिने विनवताच ‘कुंवर निजले आहेत, मी तयार होऊन येते’ असे सुवर्णमतीने आतूनच सांगून तिला जायला सांगितले. पार न पडलेल्या सुहागरातीचे गुपित ती तिच्या बाजूने तरी गुपितच ठेवणार होती.

पुढील काही दिवस, छोटे मोठे कार्यक्रम, रितीरिवाज, यात पार पडले. यासर्व कार्यक्रमांदरम्यान सुवर्णमतीचे हसून खेळून सर्वांशी वागणे, कोणी चेष्टा मस्करी केली तर प्रसंगी लाजणे, हे सर्व पाहिल्यावर, ही एक उत्तम अभिनेत्री असल्याची गवाहीच सूर्यनागास मिळाली. तो अधिकच सतर्कतेने तिच्या आसपास वावरू लागला. तिच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवू लागला.

एक महत्वाचा कार्यक्रम उरला होता तो म्हणजे परकीय पाहुण्यांसाठी जंगी मेजवानी.

शेषनागांनी विचारपूर्वक सूची तयार केली होती. भोजनसमयी ती सूर्यनागास देऊन ते म्हणाले की आणखी कोणी राहून तर गेले नाही ना पाहावे.

“लॉर्ड कार्टन चे नाव आहे ना सूचीत? ते सध्या फार चर्चेत आहेत आणि परकीय फौजेचे सर्वेसर्वा आहेत. सध्या शेषनगरीपासून काही अंतरावर असणाऱ्या फौजेच्या मुक्कामी आहेत.” सूर्यनागाने विचारले.

“हो आहे त्यांचे नाव. परंतु ते फारसे अनोळखी राज्यांत जात नाहीत असे ऐकले आहे. आपली ज्या अफसरशी ओळख होती तो सध्या परदेशी गेला आहे. आता त्यांच्याशी संधान कसे बांधावे हे कळत नाही.”

यावर मिष्टान्न स्वहस्ते परोसण्यास आलेली सुवर्णमती म्हणाली "माफी असावी, गेली अनेक वर्षे ते आपल्या इलाक्यात लहानमोठ्या फौजांचे प्रमुखपद भूषवत आहेत. काही वर्षांपासून माझा त्यांच्या कन्येशी परिचय आहे जो मैत्रीत रुपांतरीत झाला आहे.





त्यांच्याबरोबरच तिलाही आमंत्रित करावे असे मला वाटते. विवाहसमयी तिला न बोलावल्याने ती काहीशी नाराज आहे."

सूर्यनाग शंकेखोर नजरेने तिच्याकडे पाहू लागला. राजाजी मात्र बेहद्द खुश झाले.

"हे तर फारच छान आहे की बहुराणीचा लॉर्डच्या कन्येशी परिचय आहे. मी आजच खलिता.... नाही नको. कुंवर, आपण स्वयं जाऊन हे आमंत्रण करावे. आम्ही चंद्रनागास पाठवले असते, परंतु त्यांचे मन सध्या परदेशी जाण्यात रस घेत आहे. आणि कोणतीच कुचराई होणे हानीकारक ठरेल. शंखनाग आणि बडी बहू यांची इथे मदत लागेल. नाहीतर त्यांना न्योता घेऊन धाडले असते."

सुवर्णमती म्हणाली, "आपली संमती असेल तर मीही जाऊ का ? तिथले देवी माँ चे मंदिर, फार पुरातन आणि प्रसिद्ध आहे. सर्वांच्या मन्नत तिथे पूर्ण होतात असे ऐकून आहे. मीही माथा टेकवून यावे असे वाटते. विवाह नीट संपन्न व्हावा म्हणून मी मन्नत मागितली होती तीही पूर्ण होईल. मी स्वत:च जाऊन मेजवानीचे निमंत्रण दिले तर लॉर्ड मना नाही करणार, मला खात्री आहे."

राजमाता ज्या एवढा वेळ बोलणे ऐकत होत्या, त्या म्हणाल्या, "बहूने मन्नत मागितली आहे तर ती पूर्ण करायलाच हवी. कुंवर, आपण घेऊन जावे बहूस आपल्या सवे."

सूर्यनाग काहीच बोलेनात तेव्हा राजाजी म्हणाले, "कुंवर घेऊन जातील आपणांस."

त्यावर सूर्यनाग पटकन म्हणाला की "आम्हाला राज्यकारभाराची फारच तुंबलेली कार्ये मार्गी लावायची आहेत. सारथी कुंवारीस घेऊन जाईल."

त्यावर शेषनाग म्हणाले "मग चंद्रनागाने जावे बरोबर. एकट्या बहूने जाणे योग्य होणार नाही."

सूर्यनाग यावर क्षणभर गप्प झाले, मग म्हणाले "परंतु सारथ्यासह जावे. प्रवास दूरचा आहे."

राजाजींनी यावर होकार दिला.

सुवर्णमतीचा चेहरा मलूल झाला , पण तिने संमतीदर्शक मान हलवली.

विवाहोत्तर काहीतरी सतत खटकत होते शेषनागास आणि राणीसरकारांनाही. नवदंपती वरवर जरी सर्व कार्यक्रमात हसतमुखाने सहभागी होत असले तरी काहीतरी वेगळे





घडत असल्याची शंका त्यांना सतत येत होती. पण नक्की काय ते सांगणे कठीण होते. आताही त्यांना हे प्रकर्षाने जाणवले. त्यानी एकदा सूर्यनागाशी यावर बोलून पाहायचे ठरवले.

दुसऱ्या दिवशीच कूच करायचे ठरले. सुवर्णमती तयारी करण्यास आपल्या कक्षात आली. कुंवर येण्यास नाही म्हणाले तेव्हा सुवर्णमतीस चांगलेच वाईट वाटले, परंतु चंद्रनाग आल्यास दुसरी एक तिच्या मनीची योजना पूर्ण होण्यास मदत होईल असे तिला वाटले.

सूर्यनागास जे नको तेच घडत होते. आता विचार बदलून, 'मीच जातो' असे म्हणणेही उचित दिसले नसते. सारथ्यास पाठवून निदान प्रवासात ही विषकन्या, चंद्रनागाच्या मनात काही विपरीत भरविण्याची शक्यता तरी कमी झाली होती.

चंद्रनागास मात्र या प्रवासाचा आनंद मानावा, की नंतर होणाऱ्या त्रासाचा विचार करावा हे ठरवता येईना.



# भाग ११

दुसरे दिवशी प्रभातीच दोघे सारथ्यासह निघाले. सोबत अर्थातच काही सैनिकही होतेच. काही अंतर उरल्यावर दूताकरवी फौजप्रमुखांच्या भेटीची परवानगी मागावी आणि मग पुढे जावे असे ठरले.

प्रवासात दोघे कामापुरतेच बोलले. ठिकाण जवळ आल्यावर दूतास पाठवून परवानगी मिळवली आणि पुढे कूच केले. सुवर्णमती भेटीस येते आहे हे कळल्यावर जेनचा आनंद गगनात मावेना. तिने तिच्या स्वागताची जय्यत तयारी करवून घेतली.

मोटरगाडी बंगलीसमोर पोहोचताच सर्व औपचारिकता बाजूला ठेवून जेन धावतच बाहेर आली आणि आपल्या बालमैत्रिणीला घट्ट आलिंगन दिले.

सोनेरी केसांची, निळ्या डोळ्यांची, सडपातळ बांध्याची गुलाबी गोरी जेन सुवर्णमतीपेक्षा चार बोटे उंचच होती. पण तरीही एखाद्या बाहुलीसारखी नाजूक आणि सुंदर होती.

चंद्रनागाची तिच्यावर खिळलेली नजर सुवर्णमतीच्या नजरेतून सुटली नाही.

सर्वजण आत आले. दोघी मैत्रीणींना किती बोलू आणि किती नको असे झाले होते. मग सुवर्णमतीने तिची आणि चंद्रनागाची ओळख करून दिली. चंद्रनाग विलायतेत शिक्षण घेऊन आले आहेत हेही सांगितले.

तेवढ्यात लॉर्ड येत असल्याची वर्दी आली. लॉर्ड सुवर्णमतीस ओळखत होतेच. विवाहाबद्दल त्यांनी तिचे अभिनंदन केले. चंद्रनागाची ओळख करून घेतली. दोघे काहीवेळ बोलले. मग लॉर्ड सुवर्णमतीस तिच्या मातापित्यांविषयी, गंगानगरीविषयी विचारपूस करू लागले आणि जेन आणि चंद्रनाग यांच्या विलायतेविषयी गप्पा रंगल्या.

भोजन झाल्यावर सुवर्णमतीने खास मेजवानीविषयी सांगून दोघांनाही आग्रहाने येण्याचे निमंत्रण दिले. चंद्रनागानेही अगत्याने निमंत्रण दिले आणि जेनला खास आमंत्रण दिले.

मग अचानक सुवर्णमती म्हणाली की "आपण शेषनगरी येणारच आहात तर मी आताच जेनला आमच्यासवे घेऊन जाते. मेजवानीपूर्वीचे काही दिवस आम्हा मैत्रिणींना एकत्र घालवता येतील. आता परत तुम्ही या बाजूला केव्हा याल देवासच ठाऊक. कृपया आपण संमती द्यावी".





यावर लॉर्ड म्हणाले “विचार तुझ्या मैत्रिणीस, तिची इच्छा असेल तर माझी ना नाही.” दुसऱ्या दिवशी जेनसह सर्व निघाले.

परतीच्या प्रवासात चंद्रनाग बराचसा मोकळा झाला होता. मग बराच वेळ विलायतेविषयी गप्पा होत राहिल्या. परतीचा प्रवास बराच सुखकर झाला.

शेषनगरीस आधीच दूत पाठवून जेनच्या येण्याची खबर पोहोचली होती. तिच्या राहण्याची सोय सुवर्णमतीच्या कक्षाशेजारच्याच कक्षात करण्यात आली. काही सेविका तिच्यासाठी तैनात करण्यात आल्या. आल्याबरोबर सुवर्णमतीने शेषनाग आणि राणीसरकारांची भेट घेऊन, त्यांना न विचारता परकीय पाहुणीस महाली आणल्याबद्दल क्षमा मागितली. परंतु राज्यहिताच्या दृष्टीने ते योग्यच ठरेल अशी ग्वाहीही दिली. चंद्रनागाचा बदललेला नूर भोजनसमयी सर्वानाच सुखद धक्का देऊन गेला. प्रथमच सूर्यनागाच्या चेहऱ्यावरचा ताणही काहीसा सैलावला.

सौमित्रा आणि जेनची गट्टी जमण्याची लक्षणे दिसू लागली, फक्त अडचण होती भाषेची. मग सुवर्णमती म्हणाली धाकट्या कुंवरनी दुभाष्याची जबाबदारी घ्यावी. जी चंद्रनागाने आनंदाने स्विकारली.

हे सर्व बोलणे होत असताना सूर्यनागाची नजर सुवर्णमतीवर खिळली होती. तिचा हा कोणता नवा पवित्रा आहे हे त्याच्यासारख्या मुरब्बी मुत्सद्यालाही लक्षात येत नव्हते. वरवर पाहता तरी हे सर्व राज्यहिताचे, चंद्रनागाची मन:स्थिती सुधारण्यास पोषक, असेच सर्व ती करत आहे असे भासत होते. पण ज्या सुवर्णमतीस तो ओळखत होता तिची, ही केवळ धूळफेक असण्याचीच शक्यता जास्त वाटत होती. पण मग खरा हेतू काय असावा? विचार करकरून मस्तक दुखू लागले पण खरे काही कळेना. आता हिच्यावर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवावे लागणार असे दिसते. त्याने तसे करण्याचे मनोमन ठरवले.

दुसऱ्याच दिवसापासून सुवर्णमतीने आखून दिलेल्या कार्यक्रमानुसार, सौमित्रा जेनला शेषनगरीची महत्वाची स्थळे दाखवू लागली. सोबत दुभाष्याचे कार्य करण्यास चंद्रनाग होताच.



इकडे मेजवानीची संपूर्ण जबाबदारी सुवर्णमतीने आपल्या शिरी घेऊन स्वत:ला कामात इतके गुंतवून घेतले की दुसऱ्या कोणत्याही विचारास वावच मिळू नये. तिच्या आजपर्यंतच्या विलायती वाचनाचा पुरेपूर उपयोग तिने या मेजवानीसाठी करण्याचे ठरवले. योजना तयार झाली की प्रथम ती त्याच रात्री जेन आणि चंद्रनागास वाचून दाखवे, त्यांचे मत विचारे आणि त्यात आवश्यक ते बदल करी. तिच्या कामाचा आवाका पाहून सूर्यनागही आश्चर्यचकित झाला.

मेजवानीचे पदार्थ, पेय, त्यांना वाढण्याची आणि खाण्याची विशिष्ट पद्धत, मेज सजविण्याची पद्धत, यासाठी लागणारे, विशिष्ट तज्ञ आचारी, वाढपी, यांची नियुक्ती. भोजनानंतर नृत्य..... इथे तिची गाडी थोडी अडखळली ... मग अर्थातच जेन आणि चंद्रनाग मदतीस आले. विशिष्ठ संगीत, ते वाजवणारे वादक ...... सूची वाढत होती आणि त्याबरोबर सुवर्णमतीचे कामही.

मग जेन म्हणाली “ज्यांच्या विवाहाप्रित्यर्थ ही मेजवानी आहे, त्या वधूवरांना नृत्य करणे बंधनकारक आहे.” सुवर्णमती म्हणाली “मला हे विलायती पद्धतीचे नृत्य नाही करता येत.” त्यावर चंद्रनाग म्हणाला “परंतु तसे न करणे शिष्टाचारास धरून होणार नाही. मी आणि जेन एक दोन दिवसात तुम्हा दोघांना शिकवू हा नृत्यप्रकार.” तेवढ्यात सूर्यनाग कक्षात आला. मग जेन आणि चंद्रनागाने त्यास वरवधूच्या आवश्यक नृत्याविषयी सांगितले.

सूर्यनागाने फक्त एक छद्मी हास्याने भरलेली नजर सुवर्णमतीकडे टाकली. तिच्या ती जिव्हारी लागली. डोळे भरून येतात की काय अशी भिती वाटली. मग विषादाची जागा प्रचंड संतापाने घेतली.

घसा खाकरून ती म्हणाली , "कुंवर किती व्यस्त आहेत तुम्हाला माहीतच आहे आणि या मेजवानीच्या बाकीच्या तयारीत मलाही सवड मिळणे कठीण. शिवाय, मी एकवेळ त्वरेने नृत्य आत्मसात करेनही, परंतु कुंवरना ते कितपत शक्य होईल..." असे म्हणून ती काही क्षण थांबली.

"यामुळे आम्ही दिलगीरी व्यक्त करू पाहुण्यांसमोर" असे म्हणून तिने एक आव्हानात्मक नजर सूर्यनागाकडे टाकली. इतर कोणताही प्रसंग असता तर सूर्यनागासारखा स्थिरबुद्धी अशा जाळ्यात नक्कीच सापडला नसता. परंतु प्रेमज्वर, वर संशयाच्या जंतूने बाधित, तो झट्कन म्हणाला "तशी शिष्टाचाराची गरजच असेल तर करू आम्ही नृत्य". जेन





आणि चंद्रनागासारख्या सरळ मनाच्या व्यक्तींना हे अंतर्प्रवाह लक्षात येणे शक्यच नव्हते. ते दोघेही आनंदले. मग रोज रात्री नृत्यसराव करण्याचे नक्की करण्यात आले.

प्रत्येक दिवशी शेषनाग आणि राणीसरकारांना सुवर्णमती सर्व गोष्टींचा आढावा देई. सासूसासरे बहूवर बेहद्द खुश होते.

आता काही वेळेस चंद्रनाग आणि जेन दोघेच घोडसवारीस जाऊ लागले. रात्री भोजनानंतर जेन आणि चंद्रनाग नृत्याचे धडे या दोघांना देऊ लागले. प्रथम ते काही पावले नाचून दाखवत आणि मग या दोघांना करावयास सांगत.

प्रचंड अवघडलेल्या स्थितीत दोघेही नृत्याचे धडे गिरवू लागले. जेन शेवटी म्हणाली, “कुंवर ती पत्नी आहे तुमची. हक्काने कवेत घेवू शकतां तुम्ही.” चंद्रनाग आणि जेन यावर दिलखुलास हसू लागले. सूर्यनाग आणि सुवर्णमतीने मात्र गोरेमोरे होऊन एकमेकांकडे पाहिले. मग क्षणात त्यांनी नजरा दुसरीकडे वळवल्या.

कधीकधी रात्री तिघे मेजवानीविषयी चर्चा करत तेव्हा सूर्यनागही तपशील पाहू लागला, काही वेगळे वाटले तर बदल सुचवू लागला. राज्यासाठी, ही मेजवानी महत्वाची आहे हे त्याला कोणी वेगळे सांगण्याची गरज नव्हती.

एकदा दोघेच कक्षात एकटे असताना सुवर्णमती म्हणाली, “मेजवानी दरम्यान लॉर्ड कार्टन यांच्याशी आपला अधिक परिचय झाला तर बरे होईल. सध्या आपल्या दोन्ही राज्यांच्या दृष्टीने त्यांचा परिचय असणे फार महत्वाचे आहे. ही मैत्री अधिक घट्ट व्हावी यासाठी काही योजना मनी आहे, आपली संमती असेल तर सांगेन.” यावर सूर्यनाग काही बोलणार एवढ्यात सेवक राजाजींनी बोलावणे केले असल्याचा निरोप घेऊन आला आणि बोलणे तिथेच थांबले.

सुवर्णमतीच्या डोक्यात काय शिजतंय ते जाणून घेण्याची सूर्यनागाला प्रचंड उत्सुकता होती. ‘राज्यहिताच्या नावाखाली ही आपल्यावर काही दबाव तर आणणार नाही ना लॉर्डतर्फे ? तसे केले तर नंतर पस्तावेल. पण ते न कळण्याइतकी मूर्ख नाही वाटत ती. कारण हे परकीय कोणाचेच सगे नाहीत.’

पण आपणहून त्याने परत विषय काढला नाही. त्याने तिच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवले होतेच. तिच्या कक्षातून बाहेर जाणारा एक न एक कागद तपासला जात होता. बऱ्याचदा तिच्या दालनात चाललेले बोलणे तो बाहेरून ऐकत राही. कधी आतील दालनात उपस्थित असे पण दालन बाहेरून बंद दिसे. त्याच्या हाती मात्र एवढे करूनही काही लागत नव्हते.



इकडे मेजवानीचा दिवस जसजसा जवळ येत चालला तशी चंद्रनागाची हुरहूर वाढली. मेजवानीनंतर जेन वडिलांबरोबर निघून गेली असती. पण त्याला काय इलाज होता? शेवटी न राहवून तो सुवर्णमती बरोबर बोलण्याचा विचार करू लागला. आणि तशी संधीही लवकरच चालून आली.

जेन सौमित्रासह बाहेर बगिच्यात झोके घेत होती. सुवर्णमती आपल्या कक्षाबाहेरील दालनात काही लिहीत बसली होती. चंद्रनाग तेथे आला आणि त्याने सरळच विषयाला हात घातला. म्हणाला, "तू मला राज्यनाचक्कीच्या भितीने डावललेस आणि मी पार भरकटून गेलो. सर्व सोडून परदेशी जाण्याचा मानस राजाजींना सांगितला. विवाहापर्यंत थांबण्याची त्यानी अट घातली, म्हणून थांबलो. तद्नंतर इथे राहणे मरणप्राय वाटत होते. मग जेन भेटली आणि पुन: जगण्यास अर्थ मिळाल्यासारखे वाटले. आता परत तेच घडणार, मेजवानीनंतर ती निघून जाईल, यावेळेसच्या माझ्या भावना फार तीव्र आहेत. यातून सावरणे मला शक्य होणार नाही. का माझ्याच बाबतीत हे असे घडत राहते?"

त्यावर सुवर्णमती म्हणाली, "चंद्रनागा, आपण मला आपले मनोगत आपुलकीने सांगितलेत, तर एक कबुलीजबाब मलाही द्यायचा आहे. माझी आपल्यावर कधीच प्रीति नव्हती. अगदी कळायला लागल्यापासून मी आपल्या बंधूंच्या कर्तृत्वाच्या, हुशारीच्या, न्यायशास्त्रातील पारंगततेच्या कहाण्या किस्से ऐकत आले आणि त्यांची जणू भक्तच बनले. पंचमनगरीचे आक्रमण आणि तहासाठी त्यांनी ठेवलेली अट, यातून कुंवरनीच आम्हास सोडवले. त्यानंतर तर मी मनोमन त्यांनाच वरले. त्यांचाच प्रस्ताव माझ्यासाठी यावा यासाठीच मनोकामना केली. परंतु भेटीला आलात तुम्ही दोघे. आल्या क्षणापासून ते माझ्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करत होते. तुमच्या बंधूंचा 'स्व' थोडासा डिवचावा या हेतूने मी तुमच्याशी जरा अधिक हसून बोलून वागत राहिले हे खरे. आपण शर्यत लावल्यावर राजकुंवराना राहावणार नाही, आणि ते आपणहून शर्यतीत सामील होतील असा अंदाज मी बांधला, परंतु त्यांनी तो खोटा ठरवला. अत्यंत वेगाने घोडे दौडत असताना राजकुंवर पाठीमागून का होईना येत आहेत ना हे पाहण्यासाठी मी मान वळवली आणि तोल जाऊन पडले.

त्यादिनी वनमंदिरी जे घडले तो केवळ अपघाताचा परिणाम होता. आपण मला कवेत घेतले, भयभीत अवस्थेत मी तशीच काही काळ का होईना थांबले, आणि त्याची मला लगेचच पुरेपूर जाणीव होऊन, माझी मलाच शरम वाटली. आपण मात्र त्यास प्रीत समजलात. अर्थात यात तुमची काहीच चूक नव्हती.





"विवाहप्रस्तावानंतर तडक मला भेटावयास आलात. तेव्हा तुम्हाला खरे सांगून टाकावे असा विचारही मनी आला. परंतु तुमची उत्कटता आणि बोलण्यातील आवेग पाहून, रागाच्या, दु:खाच्या भरात तुम्ही काही विपरित करू नये म्हणून तुमचा भ्रम तसाच ठेवणे उचित वाटले. आणि आता मागे वळून पाहताना केले ते योग्यच होते असे वाटते. कारण आज तुम्हाला खरी प्रीत आणि आकर्षण यातील फरक समजू लागला असेल अशी आशा करते. अर्थात त्या खोटे बोलण्याची, तुमच्या बरोबर नाटकी वागण्याची, पुरेपूर शिक्षा मला मिळालीच आहे". खिन्नतेने सुवर्णमतीचे मन भरून आले.

चंद्रनाग म्हणाला, “म्हणजे मी समजलो नाही, कसली शिक्षा?”

“सध्या ते महत्वाचे नाही. आणखी एक सांगते, राग मानू नये, आपली आणि जेनची भेट मी जाणीवपूर्वकच घडवून आणली. आपल्या दोघांमधे स्नेहबंध निर्माण होतील अशी खात्री पहिल्यापासून मला वाटत होती.

"आता प्रश्न आहे जेनचा. जेनलाही तुम्हाविषयी तेच वाटते का? जे तुम्हास वाटते आहे? जर खात्री नसेल तर खात्री करून घ्या. विलायतेत पुरूषाने स्त्रीस मागणी घालायची पद्धत आहे, हे मी तुम्हास सांगावयास नको. अर्थात प्रथम स्वत:च्या भावना तपासून पाहा. कारण मी पूर्वीच सांगितल्याप्रमाणे आपणांवर प्रथम अधिकार राज्याचा, मग मातापित्यांचा आणि शेवटी आपला स्वत:चा. जेनचा विवाह आपल्या सोबत होणे राज्याच्या दृष्टीने फारच हितावह आहे. ते काम तेवढे सोपेही नव्हे. पण त्यासाठीचे सर्वतोपरी प्रयत्न मी करेन. परंतु आपणा दोघात वितुष्ट येणे राज्याच्या दृष्टीने भयंकर हानीकारक ठरेल. म्हणून, मनाशी नीट विचार करून, मगच पुढचे पाऊल उचला. शिवाय जेन माझी अतिशय लाडकी सखी आहे. एकदा उचललेले पाऊल, मागे घेता येणार नाही हे ध्यानी असावे. तिने स्वीकार केला तर पुढचे माझ्यावर सोपवा".

चंद्रनाग या विलक्षण स्त्रीकडे पाहतच राहिला. मग काही विचार करून बाहेर पडला. त्याची चाहूल लागताच बाहेरून इतका वेळ सर्व ऐकणारी व्यक्ती, पट्कन दरवाजाआड गेली आणि नंतर चंद्रनाग बाहेर पडताच विरूद्ध दिशेने दिसेनाशी झाली.





काही वेळाने नित्याप्रमाणे जेन आणि चंद्रनाग मेजवानीविषयी चर्चा करण्याच्या वेळेस कक्षात आले. परंतु येताच जेनने तिला आलिंगन दिले आणि ‘चंद्रनागाने प्रस्ताव दिला आणि आपण तो स्वीकारला असून आता लॉर्डची परवानगी घेणे कसे महत्वाचे आहे’ हे सांगितले. सुवर्णमतीने तिला दीर्घ आलिंगन देऊन दोघांचे अभिनंदन केले. तिच्या योजना मूर्तरूप घेऊ लागल्या होत्या. फक्त एक सोडून.

मग सुवर्णमतीने दोघांनाही सर्व समजावले. मेजवानीच्या दुसऱ्या दिवशी चंद्रनागाने लॉर्डकडे त्यांच्या लेकीचा हात मागावा असे सुचवले.





# भाग १२

इकडे शेषनाग आणि राणीसरकारांना हे कसे पटवून द्यावे हे समजत नव्हते. तिने सूर्यनागाशी याविषयी बोलण्याचा प्रयत्न केला होता पण मधेच बोलावणे आल्याने बोलणे होवू शकले नव्हते. आता तर तो फारसा मोकळाही भेटत नव्हता. नृत्याची तालीम करताना तर, दोघेही, त्यावेळी होणाऱ्या शारीरिक जवळीकीने इतके अस्वस्थ होत, की नंतर नजरेला नजरही देत नसत एकमेकांच्या.

शेवटी धीर एकवटून ती शेषनाग आणि राणीसरकारांशी बोलण्यास गेली. सूर्यनागास तिथे उपस्थित पाहून आधार आणि भीती दोन्हींनी मनात घर केलं. पण आता घाबरून चालणार नव्हते.

शेवटी तिने बोलण्यास सुरूवात केली. "पिताजी, अत्यंत नाजूक आणि महत्वाच्या विषयावर आपणा दोघांसोबत बोलायचे आहे." सूर्यनागाचे कान अर्थातच टवकारले.

"बोला बहुराणी, नि:शंक होऊन बोला." राजाजींनी आश्वस्त केलं

"लहानपणापासून मला हेच बाळकडू मिळालंय की राजघराण्यातील व्यक्तींवर पहिला अधिकार राज्याचा असतो. राज्याच्या दृष्टीने जे हितकारक ते त्याचे कर्तव्य. आमचा विवाहही प्रामुख्याने राजहित नजरेसमोर ठेवूनच झाला." शेषनाग आणि राणीसरकार दोघेही चमकून तिच्याकडे पाहू लागले. पण ती पुढे बोलू लागली. "आता चंद्रनागांचा विवाहही राज्यास मजबूत बनवण्यासाठी योग्य व्यक्तीशी व्हावा असे आपल्या सर्वांनाच वाटते आहे. आज राज्यास सर्वात जास्त धोका परकीयांचा आहे. त्यांना मित्र बनवून आपण बरीच वर्ष तग धरली आहे. जिथे विरोध झाला तेथील जनता देशोधडीस लागली आहे. एक वेळ अशी येईलही की आपण त्यांचा सामना करू शकू, परंतु सध्या ती स्थिती नाही.

मग या मैत्रीस नातेसंबंधात जोडता आले तर? जेन आणि चंद्रनागांचा विवाहसंबंध जुळून आला तर? आपण संमती द्याल? परकीयांचा येथील सर्वेसर्वा लॉर्डच आहेत. त्यांची लेक आपली बहू झाली, तर पुढची कित्येक वर्षे आपल्या राज्यांकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाचीच हिम्मत होणार नाही."

एवढे बोलून ती थांबली. राजाजींनी पत्नी आणि पुत्राकडे नजर टाकली. दोघेही सुवर्णमतीकडे आश्चर्याने पहात होते.



राजाजी म्हणाले, " बहू, एकतर संपूर्ण वेगळी संस्कृती, वेगवेगळी धर्मबंधने, हेही आपण नजरेआड केले तरी लॉर्ड कार्टन? त्यांचे काय? आणि चंद्रनाग आणि जेन?”

मग तिने जेन आणि चंद्रनागाविषयी त्यांना कल्पना दिली. लॉर्डला समजावण्यात आपण स्वतः प्रयत्नांची शर्थ करू असेही सांगितले. यात लॉर्ड दुखावण्याचा मोठा धोकाही ती जाणून आहे, परंतु जेन या विवाहास राजी असल्याने लॉर्ड दहा वेळा विचार करून रोष दर्शवतील असेही ती म्हणाली.

सूर्यनाग गूढ नजरेने पत्नीकडे एकटक पाहात राहिला. शेषनाग त्याच्या या नजरेकडे.

मेजवानीचा दिवस उगवला. एकेक पाहुणा येऊ लागला. खुद्द लॉर्ड कार्टन उपस्थित राहणार, हे समजल्यापासूनच सर्वांचा व्यवहार बदलला होता.

सुवर्णमतीने खास मोत्याच्या कशिद्याचे, मंद रंगाचे रेशमी वस्त्र परिधान केले. लांब केसांच्या, उंच अशा केशरचनेस मोत्यानेच सजवले. गळ्यात, हातात, नाजूक मोत्यांची आभूषणे चढवली. ती तिच्या दालनातून बाहेर आली तेव्हा चंद्रनाग, सूर्यनाग आपापल्या विलायती वेशभूषा परिधान करून तयार होते. जेन विलायती कपड्यांमधे परीसारखी दिसत होती. पण सुवर्णमती बाहेर येताच तिघांच्याही नजरा तिच्यावर खिळल्या. चंद्रनागाने आणि जेनने ताबडतोब आपली पसंती बोलून दाखवली. सुवर्णमतीने सूर्यनागाकडे पाहणेही टाळले. त्याची तिरस्काराने भरलेली नजर, तिला आत्ता याक्षणी, अतोनात वेदना देऊन गेली असती.

ती काहीच न बोलता निघाली तेव्हा जेनने तिला हातास धरून सूर्यनागाशेजारी उभे केले. तिचा हात सूर्यनागाच्या दुमडलेल्या बाहूवर ठेवून मग ती चंद्रनागाशेजारी जाऊन उभी राहिली. त्याने हात दुमडला आणि तिने त्यावर पंजा ठेवला आणि असे ते चौघे मेजवानीच्या भव्य दालनात प्रवेश करते झाले. मेजवानी उत्तम प्रकारे पार पडली. भोजनानंतरचा नृत्याचा कार्यक्रम तर बहारदार झाला. प्रथम सुवर्णमती आणि सूर्यनागाने एक नृत्य केले. शेषनागांच्या नजरेतून त्यांचे अवघडलेपण, सुवर्णमतीच्या चेहऱ्यावर मधूनच येणारे आर्त भाव, सूर्यनागाची मधूनच खिळणारी सुवर्णमतीवरील नजर, दोघेही टाळत असलेली एकमेकांची नजर, यातले काहीच सुटले नव्हते.



नृत्याचे प्रमुख आकर्षण, अर्थातच जेन आणि चंद्रनाग होते. सर्वांच्या नजरा त्या देखण्या जोडीवर खिळल्या होत्या. ही जोडी किती सुंदर नृत्य करते आहे असं सर्वचजण लॉर्डना सांगत होते.

मेजवानी संपली. तिच्या दृष्टीने जे काही करणे आवश्यक होते ते सुवर्णमतीने पार पाडले होते. त्या रात्री ती शांत, गाढ झोपी गेली. इतकी गाढ, की नंतर कितीतरी वेळ, सूर्यनाग तिला न्याहाळत उभा होता हे तिच्या गावीही नव्हते.



भाग १३

दुसऱ्या दिवशी चंद्रनाग प्रभातीच लॉर्डला भेटण्यास गेला. प्राथमिक बोलाचालीनंतर, रीतसर, जेनचा हात त्याने मागितला. यावर लॉर्ड कार्टन, प्रथम प्रचंड चकित झाले आणि आणि बघताबघता त्यांचा चेहरा रागाने लालबुंद झाला. त्यांनी जेनला बोलावणे पाठवले. आणि लगेच निघण्याचा आदेश दिला. चंद्रनागास काही उत्तर देण्याची तसदीही न घेता ते आतील दालनात निघून गेले.

सुवर्णमतीस हे कळताच ती सूर्यनागाकडे आली, आणि झालेला सर्व प्रकार तिने कथन करून आपणास ताबडतोब तिथे जायला हवे असे सुचवले. पुढे काहीच न बोलता दोघेही लगबगीने लॉर्ड कार्टनच्या कक्षाजवळ पोहोचली. भेटीसाठी आपण आल्याची वर्दी दिली. लॉर्ड कार्टनने त्यांना आत बोलावले आणि आपण लगेचच जेनसह कूच करीत असल्याचे सांगितले. सूर्यनाग काही बोलणार, तेवढ्यात सुवर्णमती चट्कन पुढे झाली आणि म्हणाली , "माय लॉर्ड, जेन माझी अत्यंत चांगली मैत्रीण आहे, आणि तिचे हित हे माझ्यासाठी प्रथमस्थानी आहे. माझे देवरजी चंद्रनाग, तिच्यावर जीवापाड प्रेम करतात आणि तीही त्यांच्यात मनाने गुंतली आहे. तुमचा यांच्या विवाहास विरोध असणं अगदी साहाजिकच आहे. दोन अगदी भिन्न संस्कृती आहेत आपल्या. भिन्न धर्मही. शिवाय विलायती लोकांच्या दृष्टीने आम्ही देसी, म्हणजेच मागासलेले वाटणंही शक्य आहे.

पण आता दुसऱ्या बाजूने विचार करूया. जेन, न-कळत्या वयापासून या देसी लोकांबरोबरच लहानाची मोठी झालीय. आता आपण विलायतेत तिचा विवाह करू पाहाल, तर तिला तिथे, आपली मुळे रुजवणं किती कठीण जाईल याचा विचार आपण केलेला दिसत नाही. शिवाय तिथे तिला राजघराणे नक्कीच मिळणार नाही."

लॉर्ड कार्टन नी अत्यंत रागाने सुवर्णमतीकडे पाहिले. पण आता थांबून चालणार नव्हते. ती पुढे म्हणाली, "शिवाय तिला तुमच्यापासून दूर राहावे लागेल ते निराळेच. दुसरा मार्ग, आपण तिचा विवाह इथल्याच एखाद्या फौजी अधिकाऱ्याशी करून द्याल. ती एका फौजी राहुटीतून दुसऱ्या फौजी राहुटीत फिरत राहील. असे जीवन तिच्या वाट्याला येईल, ज्याचा तिला मनस्वी तिटकारा आहे."

आता लॉर्ड कार्टन पेटून गेले. ही कालची पोर त्याना कैचीत पकडू पाहत होती. सीमा ओलांडली होती तिने. आणि अत्यंत भडकलेल्या कार्टनने वर्मी घाव घातला. "कुंवारी, आणि





म्हणून तुम्ही चाहता की जो तुमचा देवर, तुमच्या प्रेमात पागल आहे, मोठ्या भावाशी जिचा विवाह ठरला असताना, तिला चोरून भेटण्यास तिच्या नगरीस जातो, तिथे तुम्ही दोघे रासलीला रचता, परत येऊन तू मोठ्या भावाशी विवाह रचतेस, हे असंच सर्व, आता सुरळीत सुरू राहावे, लोकांच्या डोळ्यात धूळ फेकता यावी, म्हणून माझ्या साध्या सरळ कन्येला फशी पाडायचा डाव रचतेस?"

ते सूर्यनागाकडे आणि चंद्रनागाकडे पाहून, अत्यंत कुत्सित विखारी हसले. सगळेच उठून उभे राहिले. चंद्रनाग सरळ कार्टनच्या दिशेने प्रचंड रागात निघाला. सूर्यनागाने त्याला मागूनच थोपवले. सुवर्णमतीचा चेहरा पांढरा फटफटीत पडला होता. तिने क्षणभर डोळे मिटले. तिच्या सगळ्याच प्रश्नांची उत्तरे, एकदमच मिळाली होती तिला. सगळाच उलगडा झाला होता. तिचे अवसान गळाले. कोणत्याही क्षणी आता ती कोलमडून पडली असती. सूर्यनागाचे लक्ष तिच्या चेहऱ्याकडे गेले. मागून येऊन त्याने तिला आधार दिला.

आश्चर्यचकित मनाने त्याने नोंद केली, सुवर्णमतीकडे नुसतीच माहिती नव्हती. ती कशी, कुठे, केव्हा, आणि किती वापरायची, या चाणाक्षतेची देणगी तिला होती. आणि सगळ्यात महत्वाचे, हे सर्व वापरण्याचा निर्भीडपणा तिच्याकडे होता. पण लॉर्ड कार्टन ने तिच्या वर्मी घाव घातला होता. आता तिला आधाराची गरज होती. तिचे कमकुवत होणे फार घातक ठरले असते.

मग सूर्यनाग अत्यंत शांत पण निश्चयी स्वरात बोलू लागला. "लॉर्ड कार्टन, आपल्याला माहिती देणारे, आपले खबरे, हेर, बरीच माहिती आपल्याला देतात. पण त्याची योग्य अयोग्यता आपल्यालाच तपासून पाहावी लागते. आपणास फारच अर्धवट आणि चुकीची माहिती मिळाली आहे.

केवळ आपण आमचे पाहुणे आहात, व जेनचे वडील आहात, म्हणून आम्ही शांत राहातो आहोत. अन्यथा आमच्या पत्नीबद्दल, बंधूंबद्दल, असे दुरोद्गार काढणाऱ्याची आम्ही कधीच गय केली नसती.

आता माझ्या पत्नीने जे मुद्दे सांगितले ते नीट विचार केलात तर तुम्हाला पटतीलच. पण एक महत्वाचा मुद्दा तुमच्या कसा लक्षात नाही आलेला, याचे मला आश्चर्य वाटत आहे. मागील बंडाळीत विलायती अधिकाऱ्यांच्या स्त्रियांची झालेली होरपळ आणि फरपट आपण नक्कीच विसरला नसाल. उद्या काही कठीण परिस्थिती निर्माण झालीच तर जेन आमच्या राज्याइतकी सुरक्षित इतर कोठेच नसेल. तुमच्या फौजा तिला हात लावणार नाहीत आणि आमच्या फौजाही

स्वत:च्या राणीच्या केसालाही धक्का लावणार नाहीत. शिवाय आम्ही सगळे तिच्या सुरक्षिततेसाठी जान पणाला लावू."

सुवर्णमती आता सावरली होती. ती म्हणाली, "मगाशी आपण जे आरोप माझ्यावर केलेत, त्याविषयी तुम्ही जेनशी बोलावे. तिला सर्व सत्य परिस्थिती माहित आहे. पण एक नक्की सांगू शकते, माझ्या देवरजींबरोबर जेनच्या विवाहास मान्यता द्याल, तर आजपर्यंत ती मातेच्या प्रेमापासून वंचित राहिली ते तिला मिळेल. कुटुंबकबिला मिळेल. मला माहीत आहे मी लहान तोंडी मोठा घास घेतला. पण आपण आमच्या बोलण्याचा शांतपणे विचार करावा. आमचे म्हणणे आपणास निश्चितच पटेल. आम्ही सर्वजण आपल्या निरोपाची वाट पाहू." एवढे बोलून त्यांनी लॉर्डची रजा घेतली.

तिथून बाहेर पडताक्षणी मात्र, ती सरळ आपल्या कक्षातील लहान दालनात गेली आणि तिने दरवाजा आतून बंद केला. डोळ्यातून वाहणाऱ्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

इकडे लॉर्ड कार्टन पेचात सापडले. त्यांना सूर्यनाग आणि सुवर्णमतीचे बोलणे पटले होते. परंतु तिचा इतका भयंकर अपमान केल्यानंतर, आता प्रस्तावाचा स्वीकार करणे कठीण होऊन बसले.

त्यांनी जेनला जवळ बोलावले. तिच्याजवळ मनातली खळबळ व्यक्त केली. तिची इच्छा विचारली. तिने, चंद्रनागाशी विवाह करण्याची, तिची मनापासून इच्छा असल्याचे सांगितले. वनमंदिरी घडलेला प्रकार, त्यानंतरचा चंद्रनागाचा झालेला गैरसमज, हे सर्व त्या दोघांनीही आपल्याला पूर्ण विश्वासात घेऊन सांगितले आहे असेही ती म्हणाली. वर सुवर्णमती फार निराळी आहे, ती तुम्हास नक्कीच माफ करेल अशी ग्वाही दिली.

लॉर्ड कार्टन सर्वांच्या भेटीस आले. सुवर्णमतीची, चंद्रनागाची आणि सूर्यनागाची मनापासून माफी मागितली. विवाहास आपली संमत्ती शेषनागास सांगितली.

लवकरच विवाहाची तारीख ठरवू असे म्हणून लॉर्ड कार्टन जेनसह निघून गेले.

सर्वत्र आनंदी आनंद झाला. एक नवे पर्व शेषनगरीत सुरू होणार असे बोलले जाऊ लागले. प्रजेमध्ये अधिक सुरक्षिततेची भावना पसरली. नव्या दुल्हनने हे घडवून आणले असे सर्व जण बोलू लागले. शेषनाग आणि राणीसरकारांना बहुला कुठे ठेवू नि कुठे नको असे झाले.





बहू मात्र काही कारणाने उदास दिसत होती. शेवटी दोघांनी, जवळ बसवून तिला कारण विचारले. सूर्यनागही उपस्थित होते. मात्यापित्याच्या प्रेमाने, सासससुरजीनी उदासीचे कारण विचारताच सुवर्णमतीच्या डोळ्याला धारा लागल्या.

'काय सांगू यांना? ज्याला समजू लागल्यापासून आपल्या जोडीदाराच्या रूपात पाहिले, तो मिळावा म्हणून प्रयत्न केले, तोच माझा पती माझा अत्यंत टोकाचा तिरस्कार करतो. त्या आगीत मी रात्रंदिवस जळत आहे. कसे सांगावे?' तिला कधी नव्हे इतके असहाय्य वाटले त्याक्षणी.

शेवटी म्हणाली, "जन्मल्यापासून मातापित्याशिवाय कधीच राहिले नाही. त्यांची फार आठवण येते आहे."

"बस इतकेच ना?" दोघेही राजाराणी हसू लागले. "बेटा या सगळ्या धामधुमीत पगफेऱ्याना जाताच नाही आलेलं तुला. तर आपण लवकरच व्यवस्था करू. तुझ्या पिताजींचा निरोपही आला आहे. जाऊन ये माहेरी."

नेहमीची औपचारिकता बाजूला ठेवून राजाजींनी लेकीप्रमाणे एकेरीत उल्लेखले आणि तिला अधिकच रडू येऊ लागले. राणीसरकारांनी मग जवळ घेऊन थोपटले, तेव्हा जरा शांत झाली सुवर्णमती.





# भाग १४

त्या रात्री कुंवर त्यांच्या दालनात न जाता मुख्य कक्षातच बसलेले पाहून तिला जरा आश्चर्य वाटले. आपण इथेच थांबावे की बाहेर जावे, या संभ्रमात ती असतानाच कुंवरने चाहूल लागून वर पाहिले. या वेळेस नेहमीप्रमाणे सुवर्णमतीस पाहून त्याने मान वळवली नाही. उलट तो उठून उभा राहिला. काही क्षण अवघडलेले गेले. हीच योग्य वेळ आहे असे वाटून सुवर्णमती म्हणाली, "कुंवर, आता आपण मला माहेरी परतण्याची अनुमती द्यावी. आपणास हा विवाह इतकाच जर अमान्य होता तर आपण लग्नवेदीवर उभे राहिलातच का? असा प्रश्न मी आपणास विचारणार नाही. आपण राज्यहितास किती महत्व देऊ शकता हे माझ्याइतके इतर कोण समजू शकेल? पण मी आपणाशी केवळ राज्यहितासाठी विवाह केला नव्हता हे मात्र त्रिवार सत्य. असो. ते आता काहीच महत्वाचे उरले नाही. माझा आपण एवढा तिरस्कार करता हे माहित असते तर मी हा विवाह केलाच नसता. पण झाले ते झाले. आपल्या विवाहाने आपल्या राज्यांना जो फायदा झाला त्यात मी समाधानी आहे. परंतु आपल्याकडून मिळणारा सततचा तिरस्कार सहन करण्याची ताकद माझ्यात नाही. तो मी सहन करावा असे मला वाटतही नाही. ठरल्याप्रमाणे मी माझ्या राज्याची धुरा यथोचित सांभाळेन. आपले आमच्या राज्यावरील हक्क तसेच अबाधित राहतील. जिथे मिळून लढण्याची आपल्या राज्यांना गरज पडेल तिथे मिळून लढू. आपल्या तिरस्काराचे कारण मी विचारणार नाही. कदाचित मला ते माहीतही आहे.

एवढे बोलून ती जाण्यास वळली. सूर्यनागाने जवळ येत तिच्या खांद्यास धरून तिला आपल्याकडे वळवले. सुवर्णमतीचे डोळे भरून आले होते. आणि त्याचेही.

तो म्हणाला " एक एक घटना अशा घडत गेल्या ... वनमंदिरी तुझे चंद्रनागाच्या कवेत असणे, वर तुझ्या पिताजींनी तुझ्या संमतीने माझ्यासाठी प्रस्ताव पाठवणे, त्यानंतर तुझे आणि त्याचे पुन्हा वनमंदिरी भेटणे, मी चंद्रनागास शोधण्यास दूत पाठवले होते त्यांच्याकडून कळले.

माझ्या नजरेतून आम्हा दोघांनाही भुलवत आणि झुलवत ठेवणारी नागीण वाटत होतीस तू. संशयाचं भूत एकदा मानगुटीवर बसलं की सत्य पाहूच शकत नाही माणूस. माझंही तसंच झालं.

पिताजींनी सांगितले मला परवाच्या मेजवानीनंतर, की प्रस्ताव त्यांनीच पाठवला होता. तुझं आणि चंद्रनागाचं बोलणं नकळत ऐकू आलं आणि रीतीविरुद्ध असूनही नंतर चोरून ऐकण्याचा मोह आवरला नाही.





नंतर लॉर्डशी बोलताना, तुझा प्रामाणिकपणा समोर आला. मग एकेक चित्र साफ होत गेलं. माझी मलाच प्रचंड शरम वाटली. तदनंतरचे तुझे एकेक पाऊल तू किती विचाराने टाकले होतेस हे दिसले. तुझ्या सर्व योजना यशस्वी झाल्याच. आणि त्या सर्वच राज्यहिताने प्रेरित होत्या.

मी जे वागलो ते अत्यंत चुकीचं होतं. माफीस ते पात्रही नाही. तू म्हणशील ती शिक्षा मी त्यासाठी घेईन. पण मला सोडून जाऊ नकोस. ती मरणप्राय शिक्षा असेल माझ्यासाठी. तुझ्यावरील अलोट प्रीतीनेच मला हे असे टोकाचे वागण्यास प्रवृत्त केले. संशयाने मला अंध केले सुवर्णमती. मला माफ करून एक संधी देशील? तू आणि मी मिळून या दोन्ही राज्यांची कमान अधिकाधिक उंचावत नेऊ. पण, तुझ्या साथीशिवाय ते शक्य नाही सुवर्णमती! ”

तिच्या चेहऱ्यावर हसू आणि आंसू दोन्हींनी रंगपंचमी साधली. सूर्यनाग त्या रंगात रंगून गेला. त्याने तिचे मुख आपल्या ओंजळीत घेतले. तिने त्याच्या डोळ्यात पाहिले तेव्हा तिला तिच्याविषयी प्रेम, आणि आदर दिसला. नकळत तिची नजर खाली झुकली. त्याने तिला आपल्या कवेत घेतले. त्याच्या कुशीत ती आनंदाने शिरली. आता तिच्या सर्व योजना सफल झाल्या होत्या.

समाप्त!





**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. मधू शिरगांवकर यांचे ईसाहित्यवर हे तिसरे पुस्तक.**

सौ. मधू शिरगांवकर एक नामवंत लेखिका आहेत. अनेक नियतकालिकांतून त्यांच्या कथा व इतर साहित्य प्रकाशित होत असते. त्यांची लिखाणाची शैली प्रासादिक आहे. एखाद्या चित्रपटाप्रमाणे त्यांच्या कथा उलगडत जातात, त्याही त्या त्या प्रसंगानुरूप रस, रंग, स्वर, गंधासह. सौ. मधू शिरगांवकरांसारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (१७ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १० पुस्तके), विनीता देशपांडे (४ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।